विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक यशवंत

**सुविचार**
यदि हर कार्य यह समझकर किया जाये
कि भगवान मेरा साथी है तो असम्भव
कार्य भी सम्भव हो जायेगा ।

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. २१ मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१११ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# यूपी, गुजरात नव्हे तर भाजपा या राज्यात मारणार बाजी!



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुका आता अंतिम टप्पात आल्या असून सर्वांचे डोळे निकालाकडे लागले आहेत. कोणता पक्ष कोणत्या राज्यात बाजी मारणार हे पाहण्यासाठी सर्वजण आतुरले आहेत. सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान १ जून रोजी पार पडणार आहे. तत्पूर्वी भाजपा नेत्यांनी ६ टप्प्यांतच भाजपाने विजयाचा आकडा गाठला असल्याचा विश्र्वास व्यक्त केला आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत एक वेगळाच खुलासा केला आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत भाजपाला कोणत्या राज्यात सर्वाधिक जागा मिळणार याविषयी त्यांनी सांगितलं आहे. हे राज्य यूपी, मध्यप्रदेश, राजस्थान किंवा गुजरात नसून पश्र्चिम बंगाल आहे.

भाजपाला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा देशातील सर्वात मोठं राज्य असलेल्या उत्तर प्रदेशातून मिळाल्या होत्या. उत्तर प्रदेशातून भाजपला ६३ जागांवर विजय मिळाला होता. महाराष्ट्रातून शिवसेना-भाजप युतीने मिळून ४२ जागा जिंकल्या होत्या. तर, मध्य प्रदेश, राजस्थान, आणि गुजरातमध्येही भाजपला घवघवीत यश मिळालं होतं. मात्र, यंदाच्या निवडणुकीत भाजपला कोणत्या राज्यातून मोठं यश मिळेल याबाबत स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, पश्र्चिम बंगालच्या निवडणुकीत यंदा तृणमूल काँग्रेस अस्तित्वाची लढाई लढत आहे. येथील राज्यात गत विधानसभा निवडणुकीत आमच्याकडे केवळ ३ आमदार होते. मात्र, त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत येथील जनतेने भाजपला भरभरुन साथ दिली. भाजपने ८० जागांवर विजय मिळवला. गत विधानसभा निवडणुकीत आम्हाला मोठं यश मिळालं. त्यामुळेच, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत देशात भाजपसाठी बेस्ट परफॉर्मिंगचे स्टेट हे पश्र्चिम बंगाल असेल, असे मोदींनी म्हटले. भाजपला सर्वात मोठं यश पश्र्चिम बंगालमध्ये मिळणार आहे. येथील निवडणूक एकतर्फी झाल्याचं मोदींनी म्हटलं.

ओडिशावरही केलं भाष्य

नरेंद्र मोदींनी ओडिशा विधानसभा निवडणुकांवरही मुलाखतीत भाष्य केलं. मोदी म्हणाले, ओडिशाकडे प्रचंड नैसर्गिक संसाधने आहेत. एका समृद्ध राज्यातील गरीब लोक पाहून वाईट वाटते. भारतातील समृद्ध राज्यांत ओडिशा आहे. एवढी नैसर्गिक संसाधने आहेत. तसेच, देशातील गरीब लोकांच्या राज्यातही ओडिशा आहे. याला सरकार जबाबदार आहे. यामुळ ओडिशातील लोकांना त्यांचा अधिकार मिळायला हवा. ओडिशाचे भाग्य बदलणार आहे. सरकार बदलत आहे. मी म्हटले आहे की, ओडिशातील सरकारची एक्सपायरी डेट ४ जून आहे आणि १० जूनला भाजपचा मुख्यमंत्री ओडिशात मुख्यमंत्री (पान २ वर)

# मान्सून खबरदारीसाठी

## एकनाथ शिंदेंनी बोलावली महत्त्वाची बैठक



मुंबई : सध्या मुंबईत अधूनमधून ढगाळ वातावरण होत असून लवकरच मान्सून सुरु होण्याचे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईची दरवर्षीप्रमाणे तुंबई होऊ नये, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज महत्त्वाची बैठक बोलावली होती. पावसात मुंबई व इतर राज्यांत देखील अनेक दुर्घटना घडत असतात. भूस्खलन, दरड कोसळणे, पूर येणे, रस्ते खचणे, झाडे उन्मळून पडणे यांसारख्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी होते. त्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी यंत्रणांची आढावा बैठक घेऊन उपाययोजनांसंदर्भात आदेश दिले.

बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, अन्नधान्याचा साठा, गावांशी संपर्क साधण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना, इतर राज्याशी संपर्क करण्याची बाब यावरही चर्चा करण्यात आली. लोकांना संकटाबाबत जागृत करण्याचा प्रयत्न कसा करता येईल, धोकादायक इमारतीतील लोकांचे स्थलांतरण कसे करता येईल, याचा आढावा घेतला. याशिवाय दुष्काळाबाबत चर्चा झाली असून मदत व पंचनामा यावर सखोल चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली असून सह महत्त्वाच्या विभागाचे अधिकारी उपस्थित होते. भूस्खलनासारख्या घटना कशा टाळता येतील, याचाही आढावा घेतला. झिरो कॅज्युअल्टी मिशन नुसार काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बैठकीतील सर्व बाबींची अंमलबजावणी होईल

मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं की, जनतेला त्रास होऊ नये, जीविताला धोका होऊ नये याची खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. संकट येऊ नये यासाठी काळजी घेतली जाईल. लोकांना तात्काळ मदत देण्यासाठी यंत्रणा उभारण्यात आली आहे. तात्काळ रेस्क्यू ऑपरेशन कसे करता येईल, तसेच तुकड्या वाढवण्यासाठीही चर्चा झाली. यासोबतच यंत्रणा सज्ज आहेत, बैठकीतील सर्व बाबींची अंमलबजावणी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कोस्टल रोडच्या गळतीची पाहणी

(पान २ वर)

# संभाजीनगरमध्येही पुण्यासारखा हिट अँड रन प्रकार!

## राजकीय नेत्याच्या गाडीने बापलेकाला उडवले

छत्रपती संभाजीनगर : पुण्यात एका मद्यधुंद अवस्थेत असलेल्या अल्पवयीन मुलाने भरधाव वेगात पोर्शे कार चालवत दोन तरुणांना चिरडल्याच्या घटनेने सध्या खळबळ उडवून दिली आहे. हा मुलगा पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा असल्याने त्याला वाचवण्यासाठी अख्खी यंत्रणाच कशा प्रकारे कामाला लागली आहे, याचे रोज नवनवीन धक्कादायक खुलासे होत आहेत. त्यातच आता अशीच एक हिट अँड रन ची घटना छत्रपती संभाजीनगरमधून समोर आली आहे. एका राजकीय नेत्याच्या गाडीने दुचाकीवरून जाणाऱ्या बाप लेकाला उडवले. शिवाय मदत करण्याऐवजी ते पळून गेले.



ही घटना काल घडली असून दुसरा दिवस उलटल्यानंतरही अद्याप राजकीय नेत्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

संभाजीनगरमधील वाडगावात बाप लेकाला एका गाडीने उडवल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. ही गाडी एका राजकीय नेत्याची असल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले होते. अपघातग्रस्त बाप लेकाची प्रकृती चिंताजनक असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात एवढा भीषण होता की, गाडीच्या टायर्सचा अक्षरश: चक्काचूर झाला आहे. विशेष म्हणजे एवढे सगळं होऊनही नेते अपघातग्रस्तांच्या मदतीला आलेले नाहीत.

(पान २ वर)

# इंडिया आघाडीची १ जूनला बैठक

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागणार आहे. अशा परिस्थितीत निकालापूर्वीच इंडिया आघाडीची दिल्लीत १ जूनला बैठक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. देशभरात लोकसभा निवडणुकीची गेले दीड महिने धामधूम पाहायला मिळाली. त्यात देशभरात एनडीए विरुद्ध इंडिया आघाडी अशी काटे की टक्कर पाहायला मिळाली. आता लोकसभा निवडणुकीचा शेवटचा टप्पा राहिला आहे. त्यात १ जून रोजी इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांची महत्वपूर्ण बैठक दिल्लीत बोलावण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या बैठक कशासाठी आहे? इंडिया आघाडीचा काय प्लॅन आहे? उद्धव ठाकरे शरद पवार उपस्थित राहणार का? असे अनेक प्रश्र्न चर्चेत आहे.

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागणार आहे. अशा परिस्थितीत निकालापूर्वीच इंडिया आघाडीची दिल्लीत १ जूनला बैठक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. निवडणुकीनंतरची परिस्थिती लक्षात घेऊन होणा-या बैठकीत आपापसांत एकजूट ठेवण्याचा प्रयत्न आणि पुढील तयारीची रणनीती या बैठकीत ठरणार आहे. १ जून रोजी दिल्लीत होणा-या इंडिया आघाडीच्या बैठकीत सर्व मित्रपक्षांना सहभागी होण्याचं निमंत्रण देण्यात (पान २ वर)

# केजरीवालांना धक्का! अंतरिम

## जामीनाच्या मुदतवाढीबाबत दिलासा नाही



नवी दिल्ली : नवी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर मद्य धोरण घोटाळ्यातील मनी लाँड्रिंगचा आरोप आहे. त्या प्रकरणी ते दीड महिना तुरुंगात होते. यानंतर लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी त्यांना १० जून ते १ मे पर्यंतचा अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. मात्र, वैद्यकीय चाचणीकरता १ मे नंतर अंतरिम जामीनात ७ दिवसांची मुदतवाढ करण्यात यावी, अशी विनंती करणारा अर्ज केजरीवालांनी दाखल केला होता. या प्रकरणी तातडीने दिलासा देण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे.

अरविंद केजरीवाल यांनी अंतरिम जामीन ७ दिवसांनी वाढवून मिळावा यासाठी अर्ज केला होता. केजरीवालांचा अर्ज ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि के.व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर मांडला. या प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सुनावणी झालेली असून या प्रकरणातील निकाल राखून ठेवण्यात आला आहे. अरविंद केजरीवाल यांच्या अंतरिम जामीन अर्ज मुदतवाढीचं प्रकरण सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या पुढं योग्य निर्णयासाठी मांडावं, असं खंडपीठाने म्हटलं आहे.

अंतरिम जामीनाची मुदत १ जूनपर्यंतच

अरविंद केजरीवाल यांना ईडीने दिल्लीच्या मद्य धोरण (पान २ वर)

# टेकऑफच्या आधी इंडिगो

## फ्लाईटला बॉम्बने उडवण्याची धमकी

### दिल्लीवरून वाराणसीला जात होते विमान

मुंबई: दिल्लीवरून वाराणसीला जाणाऱ्या इंडिगो फ्लाईटला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. यानंतर लगेचच विमानाला रनवेवर रोखण्यात आले. तसेच तातडीने सर्व प्रवाशांना सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले.

विमान सकाळी ५.०४ मिनिटांनी दिल्लीच्या टी२ टर्मिनल येथून वाराणसीसाठी टेकऑफ करणार होते मात्र बॉम्बची सूचना मिळताच प्रवाशांना बाहेर काढून फ्लाईटला तपासासाठी दिल्लीच्या एअरपोर्टच्या आयसोलेशनसाठी नेण्यात आले. यावेळी बॉम्ब स्क्वॉड टीम आणि सीआयएसएफ टीमला बोलावण्यात आले. यानंतर फ्लाईटची तपासणी करण्यात आली.

इंडिगो फ्लाईटमधून लोक आले बाहेर

इंडिगो फ्लाईटमधून प्रवाशांना बाहेर काढण्याचा व्हिडिओ समोर आला आहे. या प्रवासी इमरजन्सी गेटमधून निघत आहे. प्रवाशांना विमानातून लवकरात लवकर बाहेर काढले जात आहे. यात प्रवासी घाईघाईत खिडकीतूनही बाहेर निघत आहे.

टिशू पेपरवर लिहिले होते बॉम्ब

मिळालेल्या माहितीनुसार इंडिगो फ्लाईट लॅब्रोटॉरीमध्ये एका टिश्यू पेपरवर बॉम्ब लिहिलेले आढळले होते.यानंतर एकच कल्लोळ झाला.

# बनावट नोटा छापण्याचा गोरखधंदा

## पोलिसांकडून टोळीला रंगेहाथ अटक

नाशिक : काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये पोलिसांनी सराफा व्यावसायिकांच्या दुकानांवर छापे टाकले होते. या कारवाईत पोलिसांना मोठं घबाडदेखील सापडलं होतं. ते प्रकरण ज्वलंत असताना नाशिकमधून आणखी एक धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. देशभरात फसवणूक करणाऱ्यांचे फावले असताना बनावट नोटा बनवणाऱ्या टोळीचेही प्रमाण वाढत चालले आहे. पोलिसांकडून बनावट नोटा बनवणाऱ्या आरोपींवर कठोर कारवाई करण्यात येत असली तरीही अनेक ठिकाणी बनावट नोटा छापण्याचा गोरखधंदा सुरू असल्याचं समोर आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकमध्ये बनावट नोटा छापण्याचा गोरखधंदा सुरू असल्याचं समोर आल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. नाशिकमध्ये ही टोळी बनावट नोटा छापण्याचं काम करीत होती. खऱ्या नोटा स्कॅन करून प्रिंटरवरून त्याच्या प्रिंट काढून बनावट नोटा तयार करण्यात येत होत्या. तसेच या नोटा चलनातही आणल्या जात होत्या. या टोळीकडून पाचशेच्या बनावट तयार करून त्या चलनात आणण्याचा प्रयत्न करताना अंबड पोलिसांनी या टोळीला रंगेहाथ अटक केली आहे.

हॉटेलमध्ये छापल्या पाचशेच्या नोटा

अशोक पगार, हेमंत कोल्हे, नंदकुमार मुरकुटे अशी अटक केलेल्या आरोपींची नावं आहेत. सिन्नरच्या एका हॉटेलमध्ये प्रिंटरच्या मदतीने पाचशेच्या बनावट नोटा छापल्याची कबुली आरोपींनी दिली आहे. या आरोपींकडून पाचशे रुपयांच्या ४७ बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच पोलिसांनी बनावट मोठा छापण्यासाठी वापरण्यात आलेला प्रिंटर आणि लॅपटॉप देखील हस्तगत केला आहे. दरम्यान, या आरोपींनी पाचशेच्या दोन बनावट नोटा खऱ्या नोटांमध्ये लपवल्या होत्या. त्यांनी त्या एका खाजगी बँकेच्या डिपॉझिट मशीनमध्ये चलनात देखील आणल्याची कबुली दिल्याचं अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप ठाकूर यांनी सांगितले.

# बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी! महावितरण नोकरीची सुवर्णसंधी

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. बारावीनंतर अनेक विद्यार्थी मिळेल त्या नोकरीच्या शोधात असतात. अशाच नोकरीच्या शोधात असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आनंदाची माहिती समोर येत आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म्हणजेच महावितरणमध्ये मेगाभरती सुरु करण्यात आली आहे. यामध्ये शंभर दोनशे नव्हे तर चक्क ५ हजाराहून अधिक रिक्त पदांसाठी भरती जारी केली आहे. भरतीसाठी अर्ज प्रक्रिया सुरु झाली असून त्याबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

या पदासाठी रिक्त जागा

महावितरणमध्ये विद्युत सहाय्यकच्या एकूण ५ हजार ३४७




जागा भरल्या जातील. यासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून किमान बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराकडे आयटीआयचे सर्टिफिकेट असावे. अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय १८ ते २७ वर्षांदरम्यान असावे.

विद्युत सहाय्यक पदासाठी अनुसूचित जाती संवर्गातून ६७३,अनुसूचित जमाती ४९१, विमुक्त जाती (अ) १५०, भटक्या जाती (ब) १४५, भटक्या जाती (क) १९६, भटक्या जाती (ड) १०८, विशेष मागास प्रवर्ग १०८, इतर मागास प्रवर्ग ८९५, ईडब्ल्यूएस ५०० तर खुल्या गटातील २ हजार ८१ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत.

अर्जासाठी लागणारे शुल्क

खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून यासाठी २५० रुपये अधिक जीएसटी इतके शुल्क घेतले जाणार आहे. तर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल (पान २ वर)

# मतमोजणी प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी : जिल्हाधिकारी



लातूर, / प्रतिनिधी : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होणार असून यासाठी मतमोजणी अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विविध पथके गठीत करण्यात आली आहेत. मतमोजणी प्रक्रिया शांततेत आणि अचूक होण्यासाठी या पथकातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सर्वांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्या दयानंद सभागृह येथे आयोजित प्रशिक्षणामध्ये मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. प्रभारी अपर जिल्हाधिकारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, अहिल्या गाठाळ, प्रियांका आयरे, संगीता टकले, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, शरद झाडके, मंजुषा लटपटे, सुशांत शिंदे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह सर्व तहसीलदार, मतमोजणीसाठी नियुक्त पर्यवेक्षक, मतमोजणी अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मतमोजणी प्रक्रिया अचूकपणे आणि विहित कालावधीत होण्यासाठी सर्वांनी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मतमोजणी विषयक निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी. प्रत्येक विधानसभा क्षेत्रनिहाय स्वतंत्र कक्षात मतमोजणी होणार असून टपाल मतपत्रिका मोजण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतमोजणी करणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह या माहितीची नोंद करणाऱ्या अधिकाऱ्यांनीही अतिशय काळजीपूर्वक माहिती नोंदवावी. प्रत्येकाने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडावी, असे जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे म्हणाल्या.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांनी (पान २ वर)

# तुळजापुरात सावरकर जयंती साजरी

लातूर / प्रतिनिधी- तुळजापुरातील जुन्या बस स्थानकाजवळी सावरकर चौक येथे सावरकरांच्या प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्कार भारतीचे तुळजापुरातील ज्येष्ठ कार्यकर्ते डॉक्टर सतीश महामुनी हे उपस्थित होते त्यांनी आपले विचार मांडत असताना सावरकर हे एक धगधगते कुंड असून त्यांनी राष्ट्रासाठी आपले पूर्ण आयुष्य व कुटुंब देशासाठी समर्पित केले तसेच देशाला आज त्यांच्या विचाराची अत्यंत आवश्यकता असून तुळजापुरातील सावरकर चौक हे नामकरण म्हणजे तुळजापूरचे भूषण आहे असे विचार मांडले.

तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावरकर विचार मंचचे अध्यक्ष बाळासाहेब शामराज यांनी अध्यक्षीय विचार मांडताना गेली अनेक वर्ष तुळजापूर मध्ये सावरकरांच्या विचाराचा वारसा घेऊन झालेल्या



अनेक कार्यक्रमाचा गोषवारा मांडला तसेच या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल तुळजापुरातील सर्व सावरकर प्रेमी चे आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री शिवाजीराव डावकरे यांनी केले कार्यक्रमास उपाध्यक्ष श्री उमेश जी गवते कार्याध्यक्ष श्री महेश आप्पा गरड, कार्यवाह महेश कुलकर्णी ,अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे गणेश राव जळके सर ,भारतीय जनता पार्टीचे शिवाजीराव बोधले, प्रसाद पान पुढे प्रभाताई मार्डीकर रास्व संघाचे विजयकुमार वाघमारे मस्के, सचिन राव अमृतराव , दयानंद शिंदे ,पलंगे शहाजीराव जगदाळे, डोंगरे, पत्रकार अंबादासराव पोफळे ,रमेशराव भिरंगे ,श्रीराम अपसिंगेकर दीपक त्रिकोणे ,संस्कार भारती चे पद्माकर मोकाशी सर अण्णासाहेब शेटे, शेटे वहिनी जगदीश पलंगे ,प्रशांत शेटे गिरीश राव लोहारेकर सनातन संस्थेचे अमित कदम ,बगडी इत्यादी सावरकर प्रेमी उपस्थित होते.

# श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध : पाटील



धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) – धाराशिवमध्येही आता वैद्यकिय व अभियंत्रिकी शिक्षणासाठी असलेल्या पूर्वतयारीची श्रीपतराव भोसले ज्युनियर कॉलेजमध्ये उत्तम तयारी करून घेण्यासाठी फोटॉन बॅच उपलब्ध केली आहे. त्यासाठी कोटा व दिल्ली या सारख्या ठिकाणाहून आणलेल्या तज्ञ अध्यापक वर्ग गेल्या १० वर्षांपासून कार्यरत असून अनेक विद्यार्थ्यांनी या दोन्ही पूर्व परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ११ वी मध्ये शिक्षणासाठी या हायस्कूलमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीपतराव भोसले हायस्कूलचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी दि.२८ मे रोजी केले.


एस एस सी बोर्ड १० वी परीक्षेत यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थी व पालक यांच्या सत्काराचे आयोजन संस्थेत करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्था सचिव प्रेमाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, संस्था सदस्य संतोष कुलकर्णी, संस्था सदस्य तथा फाऊडेशन बॅचचे प्रमुख यु.व्ही. राजे, प्रशासकीय अधिकारी साहेबराव देशमुख, प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक यशवंत इंगळे,हसर्व पर्यवेक्षक, गुणवत्ता सुधार समितीचे प्रमुख मनोज भुसे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पाटील म्हणाले की, पालकांनी आपल्या पाल्याला १० वी नंतर इतर शहरांमध्ये जाऊन त्यांना शाळेत घालून आवाज खर्च करण्याची गरज नाही. कारण सर्व प्रकारचे व अद्यावत शैक्षणिक सोयी सुविधा या हायस्कूलमध्ये उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे आपल्या पाल्यांना इतरत्र पाठवण्यापेक्षा येथेच ठेवावे , असेही आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुर्यकांत पाटील यांनी तर उपस्थितांचे आभार प्राचार्य साहेबराव देशमुख यांनी मानले. यावेळी विद्यार्थी, पालक, पत्रकार व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या परिक्षेत प्रशालेतून प्रथम हर्षद संतोष तोडकरी, द्वितीय प्राची युवराज सुर्यवंशी, तृतीय महादेव शिवाजी शेलार यांना १०० टक्के गुण प्राप्त झाले आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील सर्वात मोठी विद्यार्थी संख्या असलेल्या या मराठी प्रशालेत यावर्षी १० वीला ८७७ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ९० ते ९९ टक्के गुण घेतलेले १८३ तर ७० ते ८९.९९ टक्के घेतलेले ४२१ तसेच ३५ ते ६९.९९ टक्के घेतलेले २४९ विद्यार्थी असे ८६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. फक्त ९ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले असले तरी ते ११ वीला प्रवेशासाठी पात्र झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

## जिजामाता विद्यालयाचे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश







कुमठा बु: अहमदपुर तालुक्यातील कुमठा बु येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयाचा १० वी चा १००% निकाल तर प्रथम श्रेणित ११ विध्यार्थी विशेष प्रविण्यासह २७ विध्यार्थी व ९०% च्या पुढे ९विध्यार्थी ढाकणे दिव्या ९७.२०% केंद्रात प्रथम गिधाडे अश्विनी ९६% केंद्रात दुसरी ढगे रोमाताई ९५% ढाकणे अपूर्वा ९४.२०% गव्हाणे सोनाली९३%वाघमोडेसोनाली ९३% कंदरफळे कार्तिकी ९२.४०% नेवाळे मंजू ९२.२०% देशमुख अफनान ९०% या यशस्वी विध्यार्थीचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर ओमप्रकाश मोतीपावळे सचिव श्री भागशेट्टे बि. एम . सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.



**एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रा. विश्वनाथराव कराड हे लातूर येथील पत्रकार दलित चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते श्री भुजंग कांबळे (श्री. उत्तम कांबळे) यांचा पुणे येथे सत्कार करताना.**

# लुटीच्या मालासह दोन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात



धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील मालाविषयक गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेवून मालाविषयक गुन्हे उघड व पाहिजे फरारी आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सपोनि अमोल मोरे, सपोनि सचिन खटके, पोहेकॉ सय्यद, पोना जाधवर, जाधवर, ढगारे, चालक पोहेकॉ लाटे, पोकॉ किंवडे असे पथक गुन्ह्याच्या तपासाचे अनुषंगाने आवश्यक त्या साहित्यासह पेट्रोलींग कामी रवाना होवून धाराशिव शहरातील साठे चौकात आले असता पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, प्रेम उर्फ दाद्या अमर चव्हाण रा. तुळजापूर नाका धाराशिव व त्याचा साथीदार यांनी मिळून सह्याद्री हॉस्पीटल जवळील संभाजी महाराज जयंती मिरवणुकीमध्ये एका इसमास मारहाण करुन गळ्यातील सोन्याची चैन जबरीने हिसकावून पळून गेले होते. सध्या ते गावसुद रोड तुळजापूर नाका येथे थांबलेला आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन पथकाने सदर ठिकाणी गेले असता मिळालेल्या बातमी प्रमाणे एक इसम मिळून आला. पथकाने त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रेम उर्फ दाद्या अमर चव्हाण, (वय १९ वर्षे) रा. तुळजापूर नाका धाराशिव असे सांगितल्याने पथकाने नमुद आरोपीकडे गुन्ह्या संदर्भात चौकशी केली असता त्याने सुरवातील उडवा उडवीचे उत्तरे दिली. त्यांनतर पथकाने त्यास अधिक विश्र्वासात घेवून विचारपूस केली असता त्याने सांगितले की, मी व माझा मित्र रोहन कबीर गायकवाड रा. इंदीरानगर धाराशिव असे मिळून संभाजी महाराज जयंती मिरवणुकमध्ये एका व्यक्तीस मारहाण करुन गळ्यातील सोन्याची चैन जबरीने हिसकावून घेवून चोरी केलेली होती असे सांगितल्यावरून पथकाने रोहन गायकवाड याचा ठावठिकाणच्या विचारपूस करता तो सांजा रोड ब्रिज खाली थांबलेला आहे असे सांगितल्याने पथकाने रोहन गायकवाड यास ताब्यात घेवून नमुद दोन आरोपी यांच्याकडून अंदाजे १ लाख रुपये किंमतीची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जप्त केली. तसेच रोहन कबीर गायकवाड, (वय २० वर्षे) रा. पोहनेर ता. जि. धाराशिव ह.मु. इंदिरानगर धाराशिव यास अधिक विश्र्वासात घेवून विचारपूस केली असता त्यांने सांगितले की, संभाजी महाराज जयंतीमध्ये एकाइसमाच्या खिशातील एक ऍपल आयफोन १५ प्लस मोबाईल चोरी केला आहे. यावरुन पथकाने त्याच्या ताब्यातुन अंदाजे ६५ हजार रुपये किंमतीचा ऍपल आयफोन १५ प्लस जप्त करुन पुढील कार्यवाही कामी दोन्ही आरोपींना आनंदनगर पोलीसांच्या ताब्यात दिले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली सथानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, हुसेन सय्यद, पोलीस नाईक नितीन जाधवर, बबन जाधवर, ढगारे चालक पोहेकॉ लाटे, पोकॉ किंवडे यांच्या पथकाने केली आहे.



# छत्रपती शिवाजी हायस्कूल १० वी बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश

धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) – येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलने १० वी बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त केले असून शाळेचा शेकडा निकाल ९९.७४ टक्के लागला आहे. तर ९ विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेत १०० टक्के गुण प्राप्त केले आहेत.

प्रशालेतील गुणवत्तेचा आलेख पाहता ९५ % पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ६७ विद्यार्थी आहेत. तर ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे १४० विद्यार्थी आहेत. विशेष प्राविष्य मिळविणारे २९७, प्रथम श्रेणी ७२, द्वितीय श्रेणी मध्ये १६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मराठी विषयात ५, संस्कृत विषयात १९, गणित विषयात ४, विज्ञान विषयात ३ तर सामाजिक शास्त्रे विषयात १ विद्यार्थी यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रशालेच्या वतीने मंगळवारी करण्यात आला. यावेळी राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्याध्यक्षा श्रीमती शशिकलाताई घोगरे, कार्याध्यक्ष एम.डी. देशमुख, शिक्षण विस्ताराधिकारी प्रकाश पारवे, प्राचार्य पी. एन. पाटील, उपप्राचार्य एस.पी. मुंडे, पर्यवेक्षक व्ही.के. देशमुख व पालक आदी उपस्थित होते.

प्रशालेतील विद्यार्थी प्रतिक पाटील, ओम सोनटक्के, अस्मिता चादरे, वेदिका राठोड, वरद बोचरे, श्रेया साळुंके, साक्षी चव्हाण, रेवती जावळे, रेवती लाडके यांनी १०० टक्के गुण प्राप्त केले आहेत. तर ९५ टक्क्यापेक्षा जास्त गुण ६७ विद्यार्थ्यांनी मिळविले आहेत. यांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते प्रशालेचे वतीने करण्यात आला. प्रसंगी कार्याध्यक्ष एम.डी. देशमुख, अध्यक्षा शशिकलाताई घोगरे, प्राचार्य पी.एन. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्व गुणवंत विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांचे अभिनंदन संस्था पदाधिकारी व शाळा समूहाच्यातीने करण्यात आले.

# जि.प. प्रशाला वडगाव (सि) चा ९६.५५ टक्के निकाल

धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) – माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता दहावीच्या निकालामध्ये धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि) जिल्हा परिषद शाळेने आपली उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. या शाळेचा इयत्ता १० वी परीक्षेचा निकाल ९६.५५ टक्के लागला आहे. यामधील गुणवंत विद्यार्थी शाळेत प्रथम साक्षी रमाकांत चादरे ९१.४० टक्के, प्राची अरविंद चादरे ९०.४० टक्के,

गायत्री अभिमान डोके ८९.४० टक्के, जानराव समृद्धी राजेंद्र ८७.२० टक्के, वाडकर श्रद्धा ज्ञानेश्र्वर ८६.६० टक्के, मुळे वैभवी मधुकर ८५.८० टक्के, मुळे अपेक्षा रघुनाथ ८५.६० टक्के, आडगळे रेश्मा बालाजी ८२.४० टक्के, गायकवाड गायत्री ज्ञानेश्र्वर ८१.२० टक्के या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. तर शाळेचे एकूण २९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी एकूण उत्तीर्ण विद्यार्थी – २८ , विशेष प्राविण्य – १०, प्रथम श्रेणी –१० , द्वितीय श्रेणी – ७ तृत्तीय श्रेणी – १ असे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी आणि त्यांना मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक शिक्षक व शाळेचा सर्व स्टाफ यांचे अभिनंदन वडगाव ( सि ) चे भूमीपुत्र तथा शिक्षण उपसंचालक डॉ गणपतराव मोरे यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ पाटील, शाळेचे मुख्याध्यापक नाईकवाडे व्ही एच, प्रशालेचे शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य , गुरुजी विचार मंच आणि समस्त ग्रामस्थ वडगाव (सि) यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील १ लाख ६५ हजार विद्यार्थ्यांना मिळणार ५ लाख ९५ हजार पुस्तके

धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) – शैक्षणिक वर्षाची सुरुवात दि.१५ जूनपासून होणार आहे. शाळेचा पहिला दिवस असल्यामुळे विद्यार्थ्यांना देखील खूप आनंद होत असतो. त्याच दिवशी इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार मोफत पुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १ लाख ६५ हजार ४०६ विद्यार्थ्यांना २२७.१४० टन वजनाची ५ लाख ९५ हजार ४०९ पुस्तकांचे वितरित करण्यात येणार आहेत. मात्र उर्दू माध्यमांची जवळपास ५० हजार पुस्तकांच्या प्रती अद्यापपर्यंत पुस्तक भांडारातच उपलब्ध नाहीत हे विशेष वास्तव आहे.

२०२४–२५ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ दि.१५ जूनपासून सुरू करण्यात येणार आहे. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना नवी कोरी पुस्तके देण्याची तरतूद महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या सर्व मुला – मुलींना सर्व विषयांची पुस्तके मोफत वितरित केली जातात. या मराठी, हिंदी, इंग्लिश, गणित, भूमिती, इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र, विज्ञान, संस्कृत व उर्दू माध्यम आदी पुस्तकांचा समावेश आहे.

तालुका निहाय १ ली ते ५ वी, ६ वी ते ८ वी, वजन (टनामध्ये) व एकूण– (कंसात १ ली ते ८ वी) विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे धाराशिव – २४२४१ – १६२४९ – ५७.५१३ टन (४०४९०), तुळजापूर – १८२२८ – ११५२४ – ३६.९५४ टन (२९७५२), उमरगा – १५६५६ – १०३४४ – ४०.३४३ टन (२५९१०), लोहारा – ६५७३ – ४१८६ – १९.३५४ टन (१०७५९), कळंब – १३२६९ – ८१०४ – १८.५२३ टन (२१३७३), वाशी – ५४५४ – ३२८३ – २७.९९६ टन (८७३७), भूम – ९०१४ – ५५४८ – १४.५३४ टन (१४५६२) व परंडा – ८२६८ – ५५५५ – ११.९२३ टन (१३८२४) अशी जिल्ह्यातील एकूण १ ली ते ५ वी विद्यार्थी संख्या – १००६१३ तर ६ वी ते ८ वी ६४७९३ व पुस्तकांची एकूण संख्या – ५९५४०९ असून या पुस्तकांचे एकूण वजन २२७.१४० टन आहे.

**उर्दू माध्यमाची पुस्तके उपलब्ध नाहीत**

जिल्ह्यातील ऊर्दू माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील मोफत पुस्तकांचे वितरण करण्यात येत. मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना पुस्तके आवश्यक असणारी सर्व पुस्तके शिक्षण विभागाकडे उपलब्ध आहेत. मात्र उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. विशेष म्हणजे या माध्यमाची पुस्तके लातूर येथील शिक्षण भांडारामध्येच नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ती पुस्तके लवकरात लवकर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**पान १ वरून**

**यूपी, गुजरात...**

पदाची शपथ घेईल, असं मोदींनी स्पष्ट केलं.

पश्र्चिम बंगालमध्ये मतदानाची टक्केवारी वाढली

पश्र्चिम बंगालमध्ये ७ टप्प्यात मतदान होत असून गत निवडणुकांच्या तुलनेत यंदा प.बंगालमध्ये मतदानाची टक्केवारी वाढली आहे. आत्तापर्यंत झालेल्या सर्वच टप्प्यात ७६ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान करत प. बंगालच्या मतदारांनी उत्साह दाखवला आहे. संदेशखाली, ओबीसी आरक्षण, शिक्षक भरती घोटाळा आणि नंदीग्राम हिंसा यांसारख्या मुद्द्यांवर येथील निवडणूक चर्चेत होती. मात्र, मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग दाखवत निवडणुकीत सहभाग घेतल्याचं दिसून आलं. विशेष म्हणजे ४ थ्या टप्प्यात राज्यात ८० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालं आहे. त्यामुळे यंदा भाजपाला या ठिकाणी सर्वाधिक जागा मिळणार का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**मान्सून दुर्घटना...**

मुंबईत काही महिन्यांपूर्वी कोस्टल रोडचं लोकार्पण करण्यात आलं होतं. परंतु कोस्टल रोडच्या बोगद्यांच्या भिंतींना गळती लागल्याचा प्रकार उघडकीस आला होता. बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी कोस्टल रोडच्या गळतीची पाहणी केली आणि दुरुस्तीबाबत सूचना केल्या आहेत.

**संभाजीनगरमध्येही...**

या घटनेमुळे पुण्यातील घटनेप्रमाणेच संभाजीनगर प्रकरणात देखील पोलीस यंत्रणा राजकीय दबावाला बळी पडत नाही ना? असा प्रश्र्न उपस्थित केला जात आहे.

जखमी मुलगा काय म्हणाला?

दरम्यान, अपघातग्रस्त जखमी मुलाने या प्रकरणी गाडी चालवणाऱ्यांना तुरुंगात टाकले पाहिजे, आम्हाला न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी केली आहे. तो म्हणाला, आम्ही एका लग्नासाठी आमच्या गावी गेलो होतो. परतत असताना माझे वडील आणि मी दुचाकीवरुन येत होतो. अर्ध्या रस्त्यात असताना एका पांढऱ्या रंगाच्या गाडीने आम्हाला उडवले. कदाचित ते दारु प्यायलेले होते. आम्ही त्यांना हाताने इशारा करत होतो. तरीही त्यांनी आम्हाला उडवले. त्यानंतर आम्ही खड्ड्यात जाऊन पडलो. आमची मदत करण्यासाठी देखील ते थांबले नाहीत, असं अपघातग्रस्त मुलाने म्हटलं आहे.

**इंडिया आघाडीची...**

आले आहे. निवडणूक आणि निकालानंतरच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक होत असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे या बैठकीला देशातील घटक पक्षाचे आणि राष्ट्रीय पक्षाचे कोणते महत्वाचे नेते उपस्थित राहतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

इंडिया आघाडीची बैठक अशा वेळी होत आहे जेव्हा लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यासाठी मतदान होत आहे. निवडणूक निकालापूर्वी विरोधी पक्षनेत्यांची ही बैठक घेतली जात आहे. याबाबत अद्याप स्पष्टपणे काहीही सांगण्यात आलेलं नाही, परंतु आम आदमी पार्टीचे निमंत्रक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अंतरिम जामिनाचा शेवटचा दिवस आहे, त्या दिवशी ही बैठक नियोजित करण्यात आली आहे. दिल्लीत होणा-या इंडिया आघाडीच्या बैठकीला शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे जाण्याची शक्यता कमी आहे. कारण उद्धव ठाकरे सध्या परदेशात आहेत. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे या बैठकीला जाऊ शकतात आणि ठाकरे गटाकडून या बैठकीला पक्षाचा प्रतिनिधी पाठवला जाईल. तसेच, शरद पवार देखील परदेशात आहेत, ते थेट एक जूनला दिल्लीत उपस्थित राहतील. लोकसभा निवडणुकीचे निकाल काय लागतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकीकडे भाजप निवडणुकीनंतर शांत पाहायला मिळत आहेत. तर दुसरीकडे निकाल लागल्यावर इंडियाची रणनीती काय असणार? याविषयी इंडिया एक जूनला होणा-या इंडिया गाडीच्या बैठकीत सगळे ठरणार आहे.

**केजरीवालांना...**

घोटाळ्यातील मनी लॉंड्रिंग प्रकरणात अटक केली आहे. त्यांना २१ मार्चला अटक करण्यात आली होती. अरविंद केजरीवालांनी सुप्रीम कोर्टात अटकेच्या कारवाईला आव्हान दिलं होतं. सुप्रीम कोर्टाने केजरीवालांना लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी १० मे रोजी अंतरिम जामीन मंजूर केला होता. या जामीनाची मुदत १ जून रोजी संपणार आहे. अरविंद केजरीवाल यांनी २ जून रोजी आत्मसमर्पण करावं असा निकाल सुप्रीम कोर्टाने दिला होता.

दरम्यान, अरविंद केजरीवाल यांचं अटकेच्या कारवाईनंतर ७ किलोनं वजन घटलं तर कीटोन लेवल देखील वाढलेली आहे. ही गंभीर आजाराची लक्षणं असू शकतात. काही डॉक्टरांनी तपासणी केलेली आहे. झएढ-उढ स्कॅन आणि काही टेस्ट करण्याची गरज आहे. त्यामुळे सात दिवसांची मुदतवाढ मिळावी, अशी मागणी करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणी पूर्ण झाली असून निकाल राखून ठेवण्यात आला आहे. त्यामुळे केजरीवालांना तातडीने दिलासा मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

**बारावी उत्तीर्ण...**

आणि अनाथ घटकांतील उमेदवारांना दिलेल्या सवलतीनुसार १२५ रुपये अधिक जीएसटी इतके शुल्क आकारले जाईल.

या तारखेआधी करा अर्ज

इच्छुक आणि पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन माध्यमातून अर्ज मागवण्यात आले आहेत. २0जून २0२४ ही अर्ज करण्याची शेवटची तारीख आहे. उमेदवारांना महावितरणची अधिकृत वेबसाईट - https://www.mahadiscom.in/ वर जाऊन अर्ज करता येणार आहे. अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने नोटिफिकेशन काळजीपूर्वक वाचून अर्ज भरा. तसेच त्यात काही त्रुटी राहणार नाहीत, याची काळजी घ्या. अन्यथा अर्ज बाद करण्यात येईल, असे कंपनीकडून सांगण्यात आले आहे.

पात्र उमेदवारांना मिळणारे मानधन

महावितरण कंपनीकडून पात्र उमेदवारांना विद्युत सहाय्यक प्रथम वर्षासाठी १५ हजार, द्वितीय वर्षासाठी १६ हजार तर तृतीय वर्षासाठी १७ हजार इतके मानधन दिले जाणार आहे.

**मतमोजणी...**

यावेळी मतमोजणी कक्षाबाबत माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी मायक्रो ऑब्झर्व्हर यांची कर्तव्ये, मतमोजणी आकडेवारीच्या तक्त्याबाबत मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांनी सैनिकांच्या मतपत्रिका मोजणीची कार्यपद्धती सांगितली. उपजिल्हाधिकारी संगीता टकले आणि प्रियांका आयरे यांनी टपाली मतपत्रिका मोजणीबाबत मार्गदर्शन केले. उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी प्रदीप डूमणे यांनी एनकोर प्रणालीबाबत माहिती दिली. उपविभागीय अधिकारी शरद झाडके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी मतदान यंत्राद्वारे मतमोजणी याबाबत मार्गदर्शन केले. उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे आणि अरुणा संगेवार यांनी सिलिंग प्रक्रीयेबाबत मार्गदर्शन केले.

# २५ मंडळातील ३७ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ३९ कोटी रुपये वितरित – आ. पाटील

धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) – खरीप हंगाम २०२३ मध्ये सोयाबीन पिकाच्या झालेल्या नुकसानीपोटी जिल्ह्यातील १ लाख ९२ हजार शेतकऱ्यांनी ऑनलाईन तक्रारी दाखल केल्या होत्या. यातील पंचनामे झालेल्या २५ मंडळातील ३७ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ३९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. तर पंचनामे न झालेल्या उर्वरित ३२ मंडळातील शेतकऱ्यांबाबत नुकसानीची रक्कम ठरविण्याची कार्यप्रणाली अन्यायकारक असून ती बदलण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

विमा कंपनीकडे प्राप्त १ लाख ९२ हजार नुकसानीच्या पूर्वसूचनेतील २५ महसूल मंडळातील शेतकाऱ्यांच्याच नुकसानीचे पंचनामे विमा कंपनीकडून करण्यात आले होते. उर्वरित ३२ महसूल मंडळात विमा कंपनीने पंचनामे केलेले नाहीत. या महसूल मंडळातील शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र नुकसान भरपाईची रक्कम ठरवत असताना विमा कंपनी कडून अवलंबली जात असलेली कार्यप्रणाली शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक असल्याने यामध्ये दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या हंगामात पावसातील खंडामुळे झालेल्या नुकसानीपोटी २५ टक्के अग्रीम प्रमाणे यापूर्वीच शेतकऱ्यांना २५२ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

तसेच ऑनलाईन तक्रार दिलेल्या जिल्ह्यातील १ लाख ९२ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात अधिकचे १०० कोटी रुपये जमा होणे अपेक्षित आहे. मात्र विमा कंपनीकडून पंचनामे न केलेल्या ३२ महसूल मंडळाबाबत त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याने कार्यप्रणालीत दुरुस्ती करण्याचे सूचित करण्यात आले आहे. या बाबत पाठपुरावा सुरू असून लवकर पैसे मिळावे यासाठी प्रयत्न सुरु असल्याची माहिती आ पाटील यांनी दिली आहे.

# पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ६९ रुग्णांची तपासणी



लातूर / प्रतिनिधी– लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार ॲक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात एकूण ६९ रुग्णांची तपासणी करण्यात आल्याची माहिती डॉ. अशोक पोद्दार यांनी दिली.

पोद्दार ॲक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने सातत्याने अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येते. वर्षातून किमान सहा ते सात मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे काम या हॉस्पिटलच्या माध्यमातून केले जाते, हे विशेष. आजचे हे शिबीर १४३ वे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे माजी आमदार वैजनाथ शिंदे, आयएमएचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, आयएमएच्या माजी अध्यक्ष डॉ. सुरेखा काळे, माजी अध्यक्ष डॉ. दीपक गुगळे, डॉ. सतीश बिराजदार, डॉ. मंगेश कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. इमरान कुरेशी आदी मान्यवरांच्या हस्ते पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. सर्व मान्यवरांनी लोकनेत्याच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. या सर्वांचे स्वागत पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ.अशोक पोद्दार यांनी केले. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांची जयंती आणि पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून नियमितपणे अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन केले जाते. डॉ.अशोक पोद्दार यांनीच लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात अशा प्रकारच्या मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरांचा नवा वैद्यकीय सेवा पॅटर्न कार्यान्वित करण्याकामी पुढाकार घेतला, ही बाब सर्वश्रुत आहेच. आरोग्य तसेच सामाजिक क्षेत्रातही ते कायम कार्यरत असतात. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद खऱ्या अर्थाने जोपासण्याचे काम डॉ.अशोक पोद्दार आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्याने सातत्याने करत असतात.

यावेळी बोलताना माजी आ. वैजनाथ शिंदे यांनी डॉ. पोद्दार यांच्या या मोफत आरोग्य विषयक शिबीर उपक्रमाचे कौतुक केले. आज समाजात वावरणाऱ्या प्रत्येक घटकातील नागरिकांना चांगल्यात चांगली आरोग्य सेवा मिळावी यासाठी डॉ. पोद्दार नेहमी प्रयत्नशील असल्याचे पहायला मिळते,असेही ते म्हणाले. डॉ. उमेश कानडे, डॉ. सुरेखा काळे यांनीही या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. डॉ. अशोक पोद्दार यांनी यावेळी बोलताना अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व तपासणी शिबिरांच्या माध्यमातून दरवर्षी हजारो रुग्णांची सेवा करण्याची संधी आपणास मिळते,असे सांगितले. भविष्यात आपल्या हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येईल,असेही ते म्हणाले.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात एकूण ६९ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी १६ रुग्णांचे एक्सरे काढण्यात आले. १३ रुग्णांची रक्त तपासणी तर ४० रुग्णांची फिजिओथेरपी करण्यात आली. तर एका रुग्णाची ५० टक्के सवलतीच्या दरात शस्त्रक्रियाही करण्यात आली.

त्याचप्रमाणे शिबिरात सहभागी झालेल्या सर्वांच्या सर्व ६९ रुग्णांची मोफत हाडांच्या ठिसूळतेची तपासणी करण्यात आली. शिबिरात सहभागी झालेल्या सर्व रुग्णांसाठी विविध औषधी कंपन्यांच्या वैद्यकीय प्रतिनिधींनी मोफत औषधी उपलब्ध करून दिली.

# प्रकाश देशमुख जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित



लातूर : मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष प्रकाश जालिंदर देशमुख यांना पुणे येथील ग्लोबल स्कॉलर फाउंडेशनच्यावतीने पद्मश्री डॉ. विजयकुमार शहा यांच्या हस्तेफाउंडेशनचे अध्यक्ष सुनील बेळगावे यांच्या प्रमुख उपस्थितीत सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्काराने शनिवारी (दि. २५) सन्मानित करण्यात आले.

पुणे येथील यशदा च्या सभागृहात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. मुख्याध्यापक संघाच्या माध्यमातून विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असून, शिक्षकांच्या प्रश्नांवरही प्रकाश देशमुख लढा देत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार धीरज विलासराव देशमुख, शिक्षक आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, पुणे विभागीय शिक्षण मंडळाचे सचिव औदुंबर उकिरडे, तृप्ती अंधारे, संजय क्षीरसागर, अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ, पुणेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी, अध्यक्ष केरूभाऊ डोमसे, उपाध्यक्ष नंदकुमार बारवकर, शत्रुघ्न बीडकड, वसंतराव पाटील, संजय शिप्परकर, जालिंदर पैठणे, रामदास पवार, प्राचार्य डी. एन. केंद्रे, बाबूराव जाधव, सी. के. साळुंके, बी. जी. चोले, कालिदास शेळके, शिवराज म्हेत्रे, गोविंद बागल, सचिन साबने, जयश्री ठवळे, रामेश्वर कदम, सूरज भिसे, राजाराम भिसे, नानासाहेब काकडे, पारवे, संजय भोसले, अनिल मुळे, बाजीराव पाटील यांच्यासह अन्य शिक्षक व मान्यवरांनी प्रकाश देशमुख यांचे कौतुक केले.

# विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीदिनी, विलास कारखाना येथे केले अभिवादन

लातूर / प्रतिनिधी - महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रिय मंत्री आदरणीय विलासरावजी देशमुख यांचे भव्य स्मारक विलास सहकारी साखर कारखाना लि. वैशालीनगर, निवळी येथे उभारण्यात आले आहे. रवीवार दि. २६ मे रोजी आदरणीय विलासरावजी देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीदिनानिमीत्त सर्व संचालक, सभासद यांनी स्मारक स्थळी पुष्पाजली अर्पन करून अभिवादन केले.

विलास सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर आदरणीय विलासरावजी देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीदिनानिमीत्त सर्व संचालकांच्या उपस्थितीत पुष्प अर्पन करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र व्ही. काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, संचालक गोविंद बोराडे, अनंत बारबोले, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, अमर मोरे, रजित पाटील, गोविंद डूरे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभाष माने, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर यांच्यासह कारखाना सभासद, शेतकरी, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व कामगार तसेच ऊस तोडणी ठेकेदार आदी उपस्थित होते.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरा



लातूर, ता.२७ : दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा त्याग व देशप्रेम याविषयी माहिती दिली. यावेळी ग्रंथपाल प्रा.विठठल जाधव म्हणाले, स्वातंत्र्यवीर सावरकर हे महाकवी होते. त्यांनी लिहलेली पुस्तके अजरामर आहेत.

भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने, तसेच आत्मचरित्र माझी जन्मठेपफ आवर्जून वाचावयास सांगून त्यांची जीवनगाथा थोडक्यात विषद केली. सुरुवातीला प्राचार्य डॉ.राजाराम पवार यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व महाविद्यालयाच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी कळंबे, बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते, डॉ. निखिल व्यास, प्रा. लहू शेंडगे, डॉ. कदीर शेख यांसह प्राध्यापक, कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलुकरसह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यातील पाणी संकट संपविण्यासाठी उजणीचे पाणी त्वरीत आणावे :कव्हेकर



लातूर / प्रतिनिधी- मराठवाड्यातील लातूर, बीड, धाराशीव जिल्ह्याच्या पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी तत्कालीन कॉंग्रेस सरकारने उजणी धरणातील पाणी मांजरा धरणात आणण्याचा घेतला होता. त्या योजनेचे भूमिपूजन २२ वर्षापूर्वी झालेले होते. लातूरच्या सन्माननीय आमदारांनी दोन महिण्यात पाणी आणू अन्यथा आमदारकीचा राजीनामा देवू असे वक्तव्य करूनही मंत्री असतानाही त्यांना लातूरला पाणी आणता आले नाही. ते त्वरीत आणण्याची कार्यवाही करावी. लातूर जिल्ह्यात सध्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे.त्यामुळे लातूर शहर व ग्रामीण भागात पाण्यासाठी सुविधा, जनावरांना चारा, मजुरांना कामे, नरेगाचे नियम शिथील करावेत. अशा मागणीचे निवेदन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहे.


महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासामध्ये सर्व विभागाला न्याय मिळावा म्हणून मराठवाड्याचा आर्थिक अनुशेष भरून काढण्याची घोषणा विधानसभेत केली होती. त्याप्रमाणे मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळाची स्थापना १९९४ मध्ये करण्यात आली. त्याप्रमाणे आर्थिक अनुशेष भरून काढणे आवश्यक होते, परंतु तसे झाले नाही. परिणामी १ लाख कोटीचा अनुशेष रखडला आहे. शासनाने वेळोवेळी अनुशेष जाहिर केला परंतु निधी मिळाला नाही. त्यामुळे १७ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ४५ हजार कोटी व पश्चिम वाहिण्याचे पाणी मराठवाड्याला आणण्यासाठी १४०४० कोटीची घोषणा करण्यात आली. त्यासाठी जाहिर झालेला निधी त्वरीत देऊन मराठवाड्याच्या विकासाला गती देण्यात यावी, मराठवाडा वॉटरग्रीड योजना त्वरीत चालू करावी, लातूर शहरातील पिण्याचे पाणी, कचरा सफाई, लाईटसह इतर सुविधांची प्रचंड कमतरता आहे. त्याकडे प्रशासनाने लक्ष नाही. त्यामुळे याकडे त्वरीत लक्ष देऊन जनतेला सुविधा द्याव्यात. शेतकऱ्यांची विजबिले माफ करून शेतीला दिवसा किमान आठ तास लाईट द्यावी. विम्याची रक्कम त्वरीत व नुकसानीप्रमाणे द्यावी, फळबागेच्या नुकसानीची भरपाई देऊन शेतीला दिलेले पिककर्ज तत्काळ माफ करावे.

याबरोबरच महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी निवडणूक आचारसंहिता शिथील करण्यात यावी, देशामध्ये आर्थिक अडचणीमुळे मराठवाड्यामध्ये सर्वाधिक आत्महत्या होत आहेत. त्या आत्महत्या थांबविण्यासाठी धान्याच्या एमएसपी योजनेचे कायद्यात रूपांतर करावे, शेतकऱ्याला कर्ज देताना शेतीची किंमत व पिकावर होणारा खर्च स्वामीनाथन रिपोर्टप्रमाणे धान्याला भाव व त्यासाठी एकरी कर्ज द्यावे. ज्यामध्ये दहा लाखापर्यंत बिनव्याजी व त्यापुढील कर्जासाठी तीन टक्के कर्जाची व्याज आकारणी करण्यात यावी, टंचाईच्या पार्श्वभूमिवर लातूर जिल्ह्यातील प्रत्येक गावाला मागेल त्या प्रमाणात पाण्याचे टँकर व बोअरचे अधिग्रहन दोन दिवसात करावे. याबरोबरच दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमिवर शेतकऱ्यांचे सरसकट वीजबील माफ करावे, अवकाळी पाऊस व नैसर्गिक कोपामुळे मोठ्या प्रमाणात झालेले फळबागेचे नुकसान त्याचे तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी, दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आलेला आहे. त्यामुळे त्याचे पीक कर्ज व इतर कर्ज तत्काळ माफ करावे आदी मागण्याचा समावेश निवेदनामध्ये करण्यात आला असून या निवेदनावर भाजपा युवा नेते तथा युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, भाजपाचे ग्रामीण सरचिटणीस निळकंठराव पवार, विनायक मुमाने, भाजपा शहर जिल्हा उपाध्यक्ष प्रतापराव शिंदे, सुभाषअप्पा सुलगुडले, पतंजलिचे महाराष्ट्र प्रभारी विष्णू भूतडा, राजाभाऊ मुळे, बाबासाहेब देशमुख, माधवराव गायकवाड, बालाजी शेळके, बब्रूवान पवार, व्यंकटराव पन्हाळे, माजी नगरसेविका रागिणी यादव, रविंद्र कांबळे, उध्दवराव जाधव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

# शालांत परीक्षेत मानव्य विकास विद्यालयाचे घवघवीत यश

**मन्मथ पाटील १००% गुण घेऊन प्रथम तर ओंकार पासेवार ९९.४०% गुण घेऊन द्वितीय**









देगलूर(प्रतिनीधी): मार्च २०२४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत येथील मानव्य विकास विद्यालयाने घवघवीत यश मिळवत यशाची परंपरा कायम राखली असून शाळेचा निकाल ९८.०७% निकाल लागला आहे.

शालांत परीक्षेत एकूण २६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी २५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यापैकी १५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत,७३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत २४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत आणि ३ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये १००% गुण घेतलेला एक विद्यार्थी तर ९०% व त्यापेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ४२ विद्यार्थी आहेत. तालुक्यातील ग्रामीण भागातील मुलांची शाळा म्हणून मानव्य विकास विद्यालयाची ओळख असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे इथे लक्ष दिले जाते. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल कोल्हे,मुख्याध्यापक संतोष कोल्हे,,पर्यवेक्षक शरद हांद्रे ,श्याम कोल्हे आदींनी अभिनंदन केले आहे.

# लोकराजा विद्यालयाची निकालाची उज्ज्वल परंपरा कायम






अहमदपूर दि.२७ (कारामुंगीकर) - शहरातील जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ काळेगाव द्वारा संचालित लोकराजा माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा बोर्ड परीक्षेचा १००% निकाल लागला असून शाळेतून क्रमशः प्रथम गायकवाड दिक्षा मुकेश, द्वितीय गायकवाड प्रगती रुक्माजी तर तृतीय सातपुते कावेरी दयाराम आली आहे.

यशस्वी व उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव बाबुरावजी पाटील, अध्यक्ष विकास पाटील, मुख्याध्यापक आबासाहेब माने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

# बस्वराजअप्पा माळगे यांचे निधन



देगलूर(प्रतिनीधी): तालुक्यातील हणेगाव येथील ज्येष्ठ नागरिक बस्वराजअप्पा संगयाप्पा माळगे (८५ वर्ष) यांचे दिनांक २७ मे सोमवार रोजी सकाळी सात वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी,पाच मुले,सूना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. सोमवार सायंकाळी सहा वाजता त्यांच्यावर हणेगाव येथील शेतात अंतिम संस्कार करण्यात आले. नांदेड भाजपा किसान मोर्चा चे जिल्हा सरचिटणीस शिवकांत माळगे आणि येथील शिक्षक प्रभुलींग माळगे व सन्मुख माळगे यांचे ते वडील होत.







# ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुलची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

औसा: (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या शांलात परीक्षा २०२४ चा निकाल जाहिर झाला असुन तालुक्यातील आलमला येथील श्री विश्र्वेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुलचा १०० टक्के निकाल लागला.

स्कुलमधील धनश्री पुरुषोत्तम नलगे ९७.६० टक्के गुण घेऊन प्रथम, संध्या संतोष केशवे ९५.४० टक्के गुण घेऊन द्वितीय तर मानसी खंडेराव सप्ताळ ९१.६० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. तसेच स्कुलमधील अनिशा दत्तु खोजे ९१.00 टक्के, वैष्णवी दत्तात्रय पांचाळ ९0.00 टक्के, ऋतुजा सिद्धेश्र्वर सुरवसे ९0.00 टक्के, प्रतिक बालाजी लांडगे ८९.८0 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

स्कुल मधील २३ विद्यार्थी हे ८५ टक्केपेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत तर स्कुल मधील सर्वच विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाने आपल्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे व विशेष बाब म्हणजे या सर्व विध्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची शिकवणी लावली नव्हती.

यशस्वी विध्यार्थ्यांना वर्ग शिक्षक शेख मंजुरपाशा, सहशिक्षक सौरभ वडे, तानाजी जाधव, पल्लवी लद्दे, सोहेल शेख, हलिमा अरब, फिरदोस सय्यद, हबीब सय्यद, सीमा शेख, परमेश्र्वर चिलके, विनोद पांडुळे, रश्मी दुधनकर, दिपा पोतदार, सुप्रिया जाधव, नाजमीन सय्यद, गीता चौहान, दिपक खोजे, शरद सांळुके, महमद मुलानी, जवादे रुद्र यांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विध्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, योगेश धाराशिवे, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी फार्मसी कॉलेज चे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, विश्र्वेश्र्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ज्युनीअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर व स्कुलच्या प्राचार्या स्वाती कापसे यांनी केले.

### गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयाचा १०० टक्के निकाल

देगलूर(प्रतिनीधी): येथील परमपूजनीय गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयाचा दहावीच्या निकालाची याही वर्षी परंपरा कायम ठेवत १००% निकाल लागला आहे.

यामध्ये ९०% व त्या पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी - २७ विद्यार्थी,विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण विद्यार्थी - ६४ तर प्रथम श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी - २१आणि द्वितीय श्रेणीत एकूण ०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेचा निकाल १००% लागला असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, चंद्रकांत मुळे स्थानिक अध्यक्ष चंद्रकांत रेखावार, उपाध्यक्ष गिरीश वझलवार व कार्यवाह प्रकाश चिंतावार सहकार्यवाह गिरीश गोले अन्य सदस्य विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी अभिनंदन केले आहे.

# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड



देगलूर (प्रतिनिधी): अखिल भारतीय स्तरावरील आंतर विद्यापीठीय बॉल बॅडमिंटन (मुले) स्पर्धा दि. ३१ मे २०२४ ते ०३ जून २०२४ या कालावधीत जेपियार विद्यापीठ चेन्नई येथे संपन्न होणार आहेत.

या स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या संघात वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील रमेश देशमुख (बी. ए. द्वितीय वर्ष) व माधव शिवपुजे (बी. ए. प्रथम वर्ष) या खेळाडूंची निवड झालेली आहे. दिनांक २८ मे २०२४ रोजी विद्यापीठ संघ चेन्नईकडे रवाना होणार असून क्रीडा संचालक तथा उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके यांच्या हस्ते निवड झालेल्या या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रा. सतीश जांभळीकर, प्रा. अनिल ठोसरे, वरिष्ठ लिपिक सुनील देगलूरकर, कनिष्ठ लिपिक सुदर्शन सरसर, अशोक घाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. मुक्ताई प्रतिष्ठानचे सचिव राजेश महाराज देगलूरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, महाविद्यालय क्रीडा समिती सदस्य डॉ. सौ. नेरकर संजीवनी, डॉ. माळगे भीमराव, डॉ. अभिमन्यु पाटील, मुख्य लिपिक धनंजय देशपांडे यांनी विद्यापीठ संघात निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जागतिक नवीन तंत्रज्ञान स्वीकारून देशाला महासत्ता बनवू :कव्हेकर



लातूर / प्रतिनिधी- जगामध्ये आश्चर्यकारक नवीन संशोधन होत आहेत. ज्यामध्ये आर्टिफिशियल इंटिलिजन्स (एआय) रोबोटेक चंद्रावरील यान यामुळे जगामध्ये प्रचंड बदल होत आहेत. त्याचा भारतीय तरूणांनी स्वीकार करून भारताला महासत्ता बनविण्याचे स्वप्न साकार करावे. असे आवाहन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय व महाराष्ट्र विद्यालयाच्यावतीने आयोजित विवेकानंदपूरम् येथे आयोजित इयत्ता १० वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात बोलत होते.

यावेळी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष तथा युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर, जेएसपीएम संस्थेचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, समन्वयक विनोद जाधव, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवशी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदीजी यांनी जागतिक व देशातील अनेक अडचणीवर मात करून देशाचा सर्वांगिण विकास अत्यंत गतीने करीत आहे. त्यामुळे आज सर्वाधिक गुंतवणूक भारतात होत आहे. त्यामुळे भारत आज आर्थिक दृष्ट्या पाचव्या क्रमांकावर आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ६५ ते ७० वर्षापासून सुरू असलेली इंग्रजकालिन कारकुनी शिक्षण पध्दती बंद करून सीबीसीएस शिक्षण पध्दती लागू करण्याचे काम केले. या शिक्षणामध्ये अध्यात्म, विज्ञान, संशोधन आदींचा समावेश आहे. त्यातच बिल गेट्ससोबत झालेल्या चर्चे तून आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) शिक्षण पध्दतीचा समावेश देशामध्ये केला असून याचा लातूर जिल्ह्यातील पहिला कोर्स आपल्या जेएसपीएम संचलित पॉलिटेक्निक कॉलेजला मिळालेला आहे. ही आपल्या दृष्टिने आंनदाची बाब आहे. आज देशातील सर्वाधिक हुशार तरून भारत देशात आहेत आणि सर्वाधिक बेकारीही आपल्या देशात होती.ती बेकारी कमी करण्याचा प्रयत्न मा.मोदीजी करीत आहेत. आज मात्र सर्वत्र बौध्दिक संपदेचे क्षेत्र आहे. जो तो आपल्या बुध्दिमेत्तच्या जोरावर देशावर राज्य करतो आहे. ज्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तब्बत दोन वेळा १४० कोटी जनतेच्या देशाचे पंतप्रधान झाले. आताही तेच राहतील आणि स्वामी विवेकानंदांनी केलेली १८ शतकात केलेली भविष्यवाणी खरी ठरून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्त्वाखाली भारत जगाचे नेतृत्त्व करेल असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलाताना व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अब्दूल गालिब शेख यांनी केले तर आभार प्राचार्य मारुती सूर्यवंशी यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जेएसपीएम संस्था ही आदर्शवत विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहे - अजिसिंह पाटील कव्हेकर

जेएसपीएम शिक्षण संस्थेची स्थापना १९८३ मध्ये करण्यात आली. वेगवेगळ्या ३७ युनिट व १२०० कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून विद्यार्थी घडविण्याचे काम गेल्या ४१ वर्षापासून सुरू आहे. संस्कार व गुणवत्तेच्या माध्यमातून घडलेले विद्यार्थी अनेक ठिकाणी अधिकारी, डॉक्टर, इंजिनियर अशा अनेक पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे यापुढील कालावधीतही जेएसपीएम संस्थेने निर्धारीत केलेल्या अध्यात्म, विज्ञान व व्यावसायीकतेवर आधारित तेजस्वी तरूण घडविण्याचे काम करावे असे प्रतिपादन जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

# ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाचा १० वी निकालाचा उच्चांक




लातूर / प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ,पुणे यांच्या द्वारे शालांत परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला.त्यात ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राच्या गेल्या अनेक वर्षांच्या निकालाप्रमाणे याही वर्षी १० वी परीक्षेचा निकाल १००% लागला आहे.

लातूर शहरात प्रयोगशील व उपक्रमशीलतेने कार्यरत असणाऱ्या ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात केवळ अभ्यास एके अभ्यास न करता मुलांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात . मुलांचे अनुभव विश्व विस्तारित करण्याचे प्रयत्न केले जातात. कला,क्रीडा,संस्कृती, विज्ञान,तंत्रज्ञान तसेच निमंत्रित मान्यवरांच्या भेटी यातून मुलांना आपसूक भविष्यातील संधी आणि आपल्या आवडी जोपासण्याचा मंत्र दिला जातो.

हे सर्व करत १० वी वर्गाचे अभ्यासाचे नियोजन व मार्गदर्शन चालू असते. अनुभवी शिक्षक आणि दुरदृष्टी असणारे संस्थाचालक यांच्या सहवासात मुले ताणमुक्त वातावरणात शिकतात . प्रकल्पात मुलांना अधिक काळ राहून शिकता यावं याकरिता दरवर्षी दोन महिने मुलांसाठी अभ्यासिका असते . इथे त्यांना स्वअभ्यासाची सवय लागते . त्यामुळे शालांत परीक्षेच्या निकालात हे परिणाम दिसून येतात.जाहीर झालेल्या निकालात एकूण ८१ विद्यार्थी संख्येत ४ विद्यार्थ्यांनी १००% गुण घेतले आहेत.यात सार्थक चव्हाण,स्वप्नील चव्हाण,पुष्कर पाटील,व अन्वी इनामदार यांचा समावेश आहे.तर ९०% हुन अधिक गुण घेणारे ५१ विद्यार्थी,तर ८५ ते ९०% गुण घेणाऱ्यांमध्ये ११ विद्यार्थी आहेत. इतर सर्व विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व विद्यार्थी , पालक व शिक्षकांचे प्रकल्पप्रमुख सतीश नरहरे व संचालिका , मुख्याध्यापिका, सविता नरहरे व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# विमलाबाई देशमुख कन्या शाळेचे एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

अहमदपूर दि. २७ (कारामुंगीकर) : येथील विमलाबाई देशमुख कन्या शाळेने एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, माहे मार्च २०२४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेमध्ये या एकूण ८६ विद्यार्थीनी बसले असून ८३ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाले.

शाळेचा निकाल ९६.५१% एवढा लागला असून कु. कदम संस्कृती ही विद्यार्थिनी १००% आणि रानभरे दर्शना ही विद्यार्थिनी १००% गुण घेऊन विद्यालयात प्रथम आले आहेत. सुरनर ज्ञानेश्वरी ९९% द्वितीय, कोलवाड नम्रता ९८.६०% तर ९०% च्या वरील ११ ,तसेच ८५% च्या वरील ०९ विद्यार्थी आहेत. विशेष प्राविण्यामध्ये ४२ विद्यार्थिनी, प्रथम श्रेणीत ३० विद्यार्थीनी, द्वितीय श्रेणीत ०९ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे लोकायत शिक्षण संस्थेचे अध्यक्षा श्रीमती सीमाताई देशमुख, उपाध्यक्ष आबासाहेब देशमुख, सचिव ड. पी.डी. कदम, सहसचिव बाबासाहेब देशमुख, मुख्याध्यापिका श्रीमती कोयले एस.ए.(पाटील), पर्यवेक्षिका शेंडगे मॅडम, राऊत मॅडम, देशमुख सर, पेड सर, जाधव सर , जाधव मॅडम , सोनवळे सर, रेड्डी मॅडम ,गोकुळे सर, बत्तुलवार सर विद्यालयातील अध्यापक /अध्यापिका यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले.

### लोकराजा विद्यालयाची निकालाची उज्ज्वल परंपरा कायम

अहमदपूर / प्रतिनिधी- शहरातील जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ काळेगाव द्वारा संचालित लोकराजा माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा बोर्ड परीक्षेचा १००% निकाल लागला असून शाळेतून क्रमशः प्रथम गायकवाड दिक्षा मुकेश, द्वितीय गायकवाड प्रगती रुक्माजी तर तृतीय सातपुते कावेरी दयाराम आली आहे.

यशस्वी व उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव बाबुरावजी पाटील, अध्यक्ष विकास पाटील, मुख्याध्यापक आबासाहेब माने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

# श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे दहावीच्या परीक्षेत उत्तुंग यश !

## ९०% च्या पुढे गुण घेणारे तब्बल १२८ विद्यार्थी !




लातूर / प्रतिनिधी- सोमवार दिनांक २७.०५.२४ आज जाहीर झालेल्या मार्च २०२४ परीक्षेतील निकालासह सीबीएसई च्या निकालामध्ये श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या सर्व माध्यमिक शाळांनी खूप मोठी बाजी मारली .

संस्थेच्या, राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल आणि श्री बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचा सीबीएसई बोर्डाचा दहावीचा निकाल १००% लागला असून राजा नारायणलाल लाहोटी स्कूलचे २९ तर बंकटलाल लाहोटी स्कुलचे २८ विद्यार्थी ९०% च्या पुढे गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. कु भावना गोजमगुंडे (९८%) आणि चि.काबरा अथर्व , चि.अग्रवाल तन्मय (९७%) हे विद्यार्थी शाळेतून प्रथम आले आहेत .

राज्य मंडळाच्या दहावीच्या परीक्षेत श्री मारवाडी राजस्थान विद्यालयाचा निकाल ९५.५८ % लागला असून ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे ३१ विद्यार्थी आहेत. कु.बेताळे शुभदा आणि कु. वाकडे साक्षी या दोन विद्यार्थीनी ९८.६० % गुण घेवून पहिल्या आल्या .

श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयाचा निकाल ९९.०६% लागला असून या विद्यालयाच्या ४० विद्यार्थिनी ९०% च्या पुढे गुण घेणाऱ्या ठरल्या . कू गायत्री रणदिवे ही विद्यार्थिनी १००% गुण घेवून प्रथम आली आहे.

संस्थेच्या सर्व शाळांनी दहावीच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली असून तब्बल १२८ विद्यार्थी ९०% च्या पुढे* गुण घेवून उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थी , शिक्षक आणि पालकांचे , संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष , श्री लक्ष्मीरमण लाहोटी , अध्यक्ष श्री शैलेश लाहोटी , सचिव श्री आशिष बाजपाई, श्री राजेंद्रकुमार मालपाणी , श्री दिनेश इन्नाणी, श्री शरदकुमार नावंदर , श्री ईश्वर डागा, श्री लक्ष्मीकांत कर्वा, श्री आनंद लाहोटी , श्री डॉ. अनिल राठी , सौ कुमुदिनी भार्गव , सर्व संस्था कार्यकारिणी सदस्य यांनी अभिनंदन केले आहे.

# श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के



लातूर : येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा इयत्ता दहावी परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. मागच्या सलग १३ वर्षांपासून विद्यालयाने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

संस्थेच्या वतीने दहावी परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा कस्तुर- कंचन सभागृहात संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सच्चिव कमलकिशोर अग्रवाल, सहसचिव सुभाष कासले, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सौ. सुनिता जाधव, राहुल पांचाळ आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. विद्यालयाची विद्यार्थीनी कु. साक्षी सूर्यकांत माने हिने १०० टक्के गुण मिळवून विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला. कु. दर्शना विठ्ठल रोंगे हिने ९९. ८० टक्के गुण मिळवून सर्वद्वितीय तर श्रीसंत चंदर भुतेवाड व कु. तनुजा नेताजी भोईबार या दोघांनी ९९. ४० टक्के गुण मिळवून सर्वतृतीय येण्याचा मान मिळवला.

दहावीच्या परिक्षेस विद्यालयातून एकूण १६० विद्यार्थी बसले होते . ते सर्वच्या सर्व विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. एकूण १६० विद्यार्थ्यांपैकी ८१ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले आहेत. ५७ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८९. ९ टक्के, १६ विद्यार्थ्यांनी ६० ते ७४. ९ टक्के तर ६ विद्यार्थ्यांनी ४५ ते ५९. ९ टक्के गुण मिळवले आहेत. विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी मराठी विषयात ९८ गुण मिळविले आहेत. १७ विद्यार्थ्यांनी संस्कृत मध्ये १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत.पाच विद्यार्थ्यांनी इंग्रजीत ९६, तीन विद्यार्थ्यांनी गणितात ९९, दोन विद्यार्थ्यांनी विज्ञानामध्ये १०० तर एका विद्यार्थ्याने इतिहास भूगोलमध्ये १०० गुण मिळविले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सौ. सुनिता जाधव, राहुल पांचाळ, सौ. तनुजा देशपांडे, सौ. भोसले, वसुदेव जाधव, मनोज मुंदडा, मधुकर काळे, माने या अध्यापकांचाही संस्था पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश सर्वांच्या परिश्रमाचे असून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यासाचे अत्युच्च शिखर गाठण्यासाठी शिक्षणात चांगले यश मिळवावे. त्यासाठी मोबाईलचा वापर केवळ अभ्यासासाठीच करावा, अवांतर बाबींसाठी मोबाईलचा उपयोग करू नये असे सांगितले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेला अभिमान वाटतो,असे सांगून त्यांनी भावी आयुष्यासाठी, उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तनुजा देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन गिरीश कुलकर्णी यांनी केले. यासास्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, सहसचिव सुभाष कासले , कोषाध्यक्ष जयेश बजाज, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांसह सर्व शिक्षक - शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही अभिनंदन केले आहे.

# ज्ञानसागर विद्यालयची यशाची परंपरा कायम



लातूर / प्रतिनिधी- श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था हासेगाव अंतर्गत ज्ञानसागर विद्यालय हासेगाव तालुका औसा जिल्हा लातूर शाळेचा शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२४ मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश. संपादन केले.

शाळेचा निकाल ९६.२९ टक्के लागला असून विशेष प्राविण्यामध्ये ३८ विद्यार्थी तसेच प्रथम श्रेणीमध्ये आठ विद्यार्थी व द्वितीय श्रेणी मध्ये सहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे तसेच प्रथम क्रमांक कु.सोमवंशी प्रणिता ज्ञानेश्वर ९३.६०% , द्वितीय क्रमांक सुरवसे किशोर शेषराव ९०.८०% , तृतीय क्रमांक शेलार प्रणिता संतोष ९०.६०% व बुरबुरे शिवकन्या गणेश. ९०.६०% घेऊन यश संपादन केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री भीमाशंकर आप्पा बावगे, उपाध्यक्ष सौ जयदेवी बावगे, सचिव श्री वेताळेश्वर बावगे, कोषाध्यक्ष श्री शिवलिंग जेवळे, संचालक श्री नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे, सीमा बावगे, तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री कालिदास गोरे ,सहशिक्षक श्री कुटवाड सर, श्री मुलगे सर, श्री पाटील सर, श्री कोकाटे एस. के, श्री लांडगे सर, श्रीमती बावगे एस .पी., श्रीमती मुपडे मॅडम, श्री जाधव बालाजी व मुस्तफा पठाण या सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार व अभिनंदन केले तसेच त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# पंचायत सीरिजनंतर आयुष्यच बदलून गेले !


मुंबई : जितेंद्र कुमार, रघुबीर यादव, नीना गुप्ता आणि फैजल मलिक या सारख्या कलाकारांच्या भूमिका असलेली 'पंचायत ३' ही वेबसिरीज पुन्हा एकदा प्रेक्षकांना हसवण्यासाठी सज्ज झाली आहे. अलीकडेच 'पंचायत ३' चा ट्रेलर रिलीज झाला असून या ट्रेलरला प्रेक्षकांचीही पसंती मिळाली आहे. त्यामुळे आता चाहते २८ मे ला सिरीजच्या रिलीजची आतुरतने वाट पाहत आहे.

'पंचायत ३' लवकरच मेझॉन प्राइम' यावर प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे या सिरीजमध्ये महत्वपुर्ण भूमिका साकारलेला अभिनेता फैजल मलिक म्हणजेच प्रल्हाद पांडे खूप उत्सुक आहे.

ही विनोदी सिरीज ग्रामीण भारतावर आधारित आहे. या नवीन सिझनमध्ये फुलेरा गावातील नवीन आव्हाने आणि संघर्ष पाहायला मिळेल.

'मला अभिनयात संधी मिळू लागल्या आहेत'

सीझन २ मध्ये बलिदान दिलेल्या सैनिकाच्या वडिलांच्या भूमिकेतील प्रल्हाद पांडेच्या भूमिकेचे काही भावनिक पैलू प्रेक्षकांना पाहायला मिळाले-ले. यावर अभिनेता म्हणाला, 'माझ्यासाठी ते खूप




कठीण होते. गेल्या सीझनमध्ये मी सात दिवस भावनिक दृश्ये चित्रित केली होती. मी सात दिवस त्या मूडमध्ये होतो.

खरंतर ते सोपे नव्हते. 'पहिल्या सीझनपेक्षा तिसरा सीझन चांगला'

उत्तम कामामुळे मिळालेली लोकप्रियताही कलाकारांसाठी त्यांच्या चाहत्यांकडून आशा आणि जबाबदारी घेऊन येते. पंचायत या वेबसिरीजमधील उप प्रधान प्रहलाद पांडेच्या भूमिकेतून प्रसिद्ध झालेल्या अभिनेता फैसल मलिकलाही आता त्याच्या जबाबदाऱ्या वाढताना दिसत आहे.

या सिरीजच्या तिसऱ्या सीझनबद्दल एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्याने सांगितले की, 'सिरीज खूप छान लिहिली गेली आहे. पहिल्या दोन सीझनपेक्षा तिसरा सीझन चांगला आहे. यावेळी कथेत अनेक रंजक गोष्टी आहेत, ज्या प्रेक्षकांना खूप आवडतील.

'पंचायत' नंतर माझ्या आयुष्यात खूप बदल झाले आहेत. पूर्वी मी माझ्या कंपनीच्या बॅनरखाली चित्रपट आणि कार्यक्रमांची निर्मिती करायचो. सामान्य माणसाच्या जीवनावर आधारित चित्रपट आम्ही केले. 'पंचायत'नंतर आता मला अभिनयातही खूप संधी मिळत आहेत. लोक माझ्याबद्दल या गोष्टी ओळखू लागल्याने माझी जबाबदारी खूप वाढली आहे. आता आणखी चांगले काम करावे लागेल. मीही चांगले काम करण्याचा प्रयत्न करत आहे.

फैसल मलिकचे काम- फैसल मलिकने कंगना रणौतचे 'रिव्हॉल्वर रानी', 'मैं और चार्ल्स' आणि 'सात अच्छे' या चित्रपटांची निर्मिती केली. याशिवाय त्याने अनेक जढढ प्लॅटफॉर्मवर काम केले आहे. आता तो लवकरच 'देढ बिघा जमीन', 'सब फर्स्ट क्लास है' या बरोबर चार चित्रपट आणि तीन वेब सिरीजमध्ये दिसणार आहे.

# ज्येष्ठ निर्मिती व्यवस्थापक शेखर सोमण यांचे निधन

पुणे : मराठी चित्रपट, दूरचित्रवाणी मालिकांचे तसेच शेकडो जाहिरातपटांचे ज्येष्ठ निर्मिती व्यवस्थापक शेखर सोमण यांचे अल्पशा आज-राने नुकतेच निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. ते अविवाहित होते. प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक कमलाकर तोरणे यांच्या बाळा गाऊ कशी अंगाई', देवता', आई पाहिजे', आम्ही दोघे राजा राणी' या चित्रपटांची तसेच कांचन नायक, वेणुगोपाल यांच्या चित्रपटांची, जाहिरात आणि माहितीपटांची तसेच अलीकडच्या काळात खाद्य भ्रमंती', सोनियाचा उंबरा' अशा अनेक मराठी मालिकांची निर्मिती व्यवस्था त्यांनी सांभाळली होती.



# मतदार उदासीन का..?

निवडणूक आयोग, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांनी मतदान वाढावे, यासाठी भरपूर प्रयत्न केले, बूथस्तरापर्यंत यंत्रणा राबवल्या; परंतु मतदान वाढले नाही. मतदार आपला हक्क का डावलतो आहे, आपले सरकार निवडण्याबाबत उत्सुक का नाही, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. निवडणुकीच्या रणात पायाभूत सुविधा, शेतीविषयक धोरणे, महागाई, बेरोजगारी आदी मुद्यांना फारसे स्थान नसल्याने मतदार निरुत्साही आहेत का, याचाही पक्षांनी गांभीर्याने विचार करायला हवा.

लोकशाहीच्या मतोत्सवातील पहिल्या तीन टप्प्यांमध्ये मतदान कमी का झाले आणि नंतर मतदानाच्या आकड्यांमध्ये वाढ का झाली, हे प्रश्न अनुत्तरित आ-हेत. अनेकांनी अनेकप्रयत्न करूनही मतदान साधारण झाले.त्यातही अप्रगत आणि ग्रामीण भागात मतदान वाढत असताना प्रगत राज्ये आणि शहरी भागात तु-लनेने कमी मतदान होणे ही चिंतेची बाब आहे.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात हिंदू, मुस्लिम, काळे-गोरे, परराष्ट्र धोरण, पाकिस्तानची आण्विक शक्ती, अंबानी-अदानी अशा सामान्यांशी निगडीत नसलेल्या मुद्यांवर राजकीय पक्ष धुरळा उडवतात, तेव्हा पायाभूत सुविधा, शेतीवियक धोरणे, महागाई, बेरोजगारी आदी मूलभूत मुद्यांना निवडणुकीत फारसे स्थान नसल्याने मतदारांची उदासीनता वाढली असेल, तर राजकीय पक्षांनी गांभीर्याने विचार करायला हवा. नाग प्रदेशाच्या चार जिल्ह्यांमधून पहिल्या टप्प्यात सुरू झालेला मतदानावरील बहिष्कार आता गुजरात आणि महाराष्ट्रात पोहोचला आहे. त्यातही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे गृहराज्य असलेल्या गुजरातच्या २५ लोकसभा मतदारसंघांमध्ये नोंदणी केलेल्या ४.७९ कोटी पात्र मतदारांपैकी १.९० कोटी मतदारांनी मतदान का केले नाही, हा प्रश्न विचार करायला लावणारा आहे.

नागरिक मतदान करण्यास कशामुळे प्रवृत्त होतो, या प्रश्नावर येण्याआधी, मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे हे आपण का विसरतो, याचाही विचार करायला हवा. निवडणूक आयोगापासून सरन्यायाधीश आणि सरसंघचालकांपर्यंत सगळेच मतदान करण्यासाठी पहिल्या टप्प्यापासून आग्रही आहेत. देशात मतदान अद्याप सक्तीचे करण्यात आलेले नाही; ते ऐच्छिक आहे. त्यामुळे मतदान केले नाही, तरी काही फरक पडत नाही, ही बेपर्वा वृत्ती मतदान न वाढण्यामागचे प्रमुख कारण आहे. राजकीय पक्षांमधील सध्याची नळावरची भांडणे मतदारांमध्ये उदासीनता निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहेत. मतदानाच्या टक्केवारीवरून दिसून येते की सरासरी ४० टक्के मतदारांना मतदान करण्याची इच्छा नसते. हे मतदार कोण आहेत आणि त्यांच्या या अनिच्छेने कोणाला फायदा होतो आणि कुणाला तोटा होतो हे जाणून घेण्याची गरज आहे.




ही निवडणूक लोकांना मतदानासाठी प्रवृत्त करू शकेल अशा कोणत्याही मुद्यावर आधारित आहे का? आज-वर कोणत्याही पक्षाने मांडलेला मुद्दा कायमस्वरूपी कार्यरत होताना दिसतो का, या प्रश्नातच मतदान कमी का होते, याचे उत्तर दडले आहे. देशभरातील निवडणुका मतदारांना एकत्र आणू शकतील असे कोणतेही राजकीय किंवा सामाजिक वातावरण नाही. २०१४ प्रमाणे एका व्यक्तीची लाट यंदा नाही . २०१९ च्या बालाकोटच्या घटनेनंतर पाकिस्तानविषयी रागा-ची जी तिडीक मतदारांना मतदान केंदापर्यंत घेऊन गेली, तशी स्थिती सध्या नक्कीच नाही. प्रथमच राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न उच्चभ्रू कक्षांमधून बाहेर पडला आणि सार्वजनिक समस्या बनला.

निवडणुकांमध्ये महत्त्वाचे मुद्दे आणणे हे खरे तर सत्तेसाठी लढणाऱ्या विरोधकांचे काम आहे. यामध्ये विरोधी पक्ष सपशेल अपयशी ठरला आहे, तर सरकार या वेळी विरोधकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना मैदानात उतरवताना दिसत आहे आणि त्याचे मुद्दे चर्चे-तून गायब आहेत. गेल्या काही वर्षांतील महत्त्वाच्या घटनांवर नजर टाकली तर लक्षात येईल, की सरकारने राबवलेल्या निर्णयांमुळे लोकांना त्यांच्या अनुभवांचा विचार करायला किंवा आनंद-दुःख साजरे करायला वेळ मिळाला नाही.

नोटाबंदी आणि वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) मध्यरात्री लागू करण्यात आले..यानंतर समाजाला अडचणींचा दीर्घकाळ सामना करावा लागला. नागरिकत्व दुरुस्ती कायद्याविरोधातील आंदोलनांचा दैनंदिन जीवनावर परिणाम होत असताना ते संपले. आंदोलन संपल्यावर आरोग्य आणीबाणी लागू झाली. या टाळेबंदीत सरकारने गरीबातल्या गरीबांसाठी काही काम केले; परंतु देशातील ४० टक्के मध्यमवर्ग सामाजिक-राजकीय प्रक्रियेपासून दूर गेला.

राष्ट्रीय गुन्हे सांख्यिकी ब्यूरो (एनसीआरबी)ने जाहीर केलेले २०२१ नंतरचे आत्महत्येचे आकडे पाहिले तर एक भयावह स्थिती पुढे येते. नोकरदार, उद्योजकांच्या व तरुणांच्या आत्महत्या वाढल्या. एक तर कोरोनानंतर नोकऱ्यांच्या उपलब्धतेचे प्रमाण कमी झाले. पगार कमी झाले आणि कामाचे तास वाढले. या सर्वांचा परिणाम होऊन लोकांची राजकीय पक्षांविषयीची भावना बदलली. आर-ोप-प्रत्यारोपात हरवलेल्या निवडणुकीकडे अनेक घटक पाठ फिरवून आपल्याच कोषात रमले. आधुनिक इतिहासात पहिल्यांदाच उद्योजक आणि तरुणांनी आत्महत्यांमध्ये शेतकऱ्यांना मागे टाकले. हे असे लोक होते, ज्यांच्याकडे शेतकऱ्यांप्रमाणेच स्वत:साठी पुरेसे अन्न पिकवण्यासाठी जमीनही नव्हती. या आत्महत्या अजूनही सुरूच आहेत.


गेल्या चार वर्षांमध्ये आत्महत्येचे स्वरूप बदलले आहे. आता लोक एकटे नाहीत, तर कुटुंबासह सामूहिक आत्महत्या करत आहेत. निम्नवर्गीय आणि मध्यमवर्ग सामाजिक चिंतेपासून मोठ्या प्रमाणावर दूर गेला आणि कुटुंब, घर आणि खर्च व्यवस्थापित करण्यापुरतेच त्याचे विश्व मर्यादित झाले. सरकार म्हणते, प्रत्येकी पाच किलो रेशन देऊन ऐंशी कोटी लोकांना वाचवले; परंतु त्यातील फोलपणा लगेच लक्षात येतो. आता सरकार कुठूनही आणि काहीही आकडेवारी काढून तोंडावर मारून मोकळे होत असले तरी प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे, हे सत्ताधारी पक्षा-चे लोकही सरकारला सांगत नाहीत. ते आत्ममग्न आहेत.

विरोधक तर त्यांची बँक खाती गोठवण्यापासून तपास यंत्रणांच्या गैरवापरामुळे मानसिक दडपणाखाली असल्याने देशात काय चालले आहे, याची पर्वा करु शकत नाहीत. सरकारी रेशनवर जगणारे पन्नास कोटी लोक असतील असे गृहीत धरले, तर अंदाजे ९९ कोटी मतदारसंख्येपैकी ते निम्मे आहेत. एकापाठोपाठ आलेल्या संकटातून वाचलेले हे लोक गेल्या काही काळापासून थांबून स्वतःचाच विचार करत आहेत. एकामागून एक मेगा इव्हेंट्स आयोजित करणाऱ्या सरकारने नकळत त्यांना स्वतःचा विचार करायला पुरेसा वेळ दिला आहे. सत्ताधारी पक्षातील सर्वसामान्य कार्यकर्तेही विचार करू लागले आहेत.

आमच्या पक्षाच्या राजवटीत सत्य बोलण्याची आणि त्यासाठी लढण्याची संधी पूर्वीपेक्षा कमी झाली आहे. सरकारला तुम्हाला आयुष्यभर भिकारीच ठेवायचे आहे' हे एका नेत्याचे खासगीतील म्हणणे म्हणजे हे प्रकरण आता अस्तित्वाच्या पलीकडे गेले आहे याचे निदर्शक आहे. गेल्या काही वर्षांपासून सामान्य माणसाला राजकीय प्रक्रियेपासून सतत दूर ठेवण्यात आले आहे. लोकशाही संवादात गुंतलेले राष्ट्र असणे अपेक्षित आहे. येथे फक्त माझेच ऐका, तुमचे ऐकायला मला वेळ नाही, अशी सत्ताधाऱ्यांची वृत्ती आहे.

संवादाची पहिली अट म्हणजे विचार. विचार करणारा माणूसच व्यक्त होतो. सामूहिक अभिव्यक्तीचा टप्पा अजून दूर आहे. संवादालाही वेळ लागेल. सध्या लोक विचार करत आहेत आणि एखादा माणूस विचार करतो, तेव्हा त्याला आपल्यावर झालेल्या अन्यायाची आठवण होते आणि इतरांबाबत झालेल्या चुकीबद्दल सहानुभूती निर्माण होते. योगायोगाने आ-पले कटू अनुभव लक्षात ठेवण्याची आणि इतरांवर झालेला अन्याय समजून घेण्याची ही वेळ सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात आली. इतिहास साक्षी आहे की हा समाज नेहमीच दुर्बलांच्या पाठीशी उभा राहिला आहे. हा समाज अद्याप सावरतो आहे. आपल्याला नेमका न्याय कोण देऊ शकतो, खरे तर देऊ शकतो का नाही, याबद्दल त्याचे अंतिम मत उभे राहणे बाकी आहे. या सगळ्याचा परिपाक म्हणून मतदार विचार करुन, ठाम भूमिका घेऊन मतदानासाठी पुढे सरसाव-ताना दिसलेला नाही.-विशेष : भागा वरखडे

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# लाल बहादुर शास्त्री विद्यालयातील गुणवंत



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संकेत कमलापुर | संध्या मदने | श्रध्दा कुलकर्णी | बालाजी पाटील | श्रीहरी सावळे | वैष्णवी विरकपाळे | पार्थ केंद्रे | कुणाल पाटील | सायली सावळे | प्रतीक पंडगे | अनुष्का बोळेगावे | रोहण पाटील |
| १०० % | १०० % | १०० % | १०० % | ९९.६० % | ९९.६० % | ९९.४० % | ९९.४० % | ९९.४० % | ९९.२० % | ९९.०० % | ९८.८० % |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातक सावंत | निष्ठा भांगे | सिध्देश्वर जायभाये | सिध्दरामेश्वर वडले | आदित्य वकिल | अथर्व घोंगडे | सायली जाधव | नंदिनी नाळापुरे | मधुरा तेलंगे | श्रेया येरोळे | प्रणाली शिंदे | वेदिका मुस्कावाड |
| ९८.६० % | ९८.४० % | ९८.४० % | ९८.२० % | ९८.२० % | ९८.०० % | ९८.०० % | ९८.०० % | ९८.०० % | ९७.८० % | ९७.६० % | ९७.२० % |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्लोक कोडगीरे | प्रवरी कुलकर्णी | निकिता भायकट्टे | समृध्दी आचमारे | अमित बिरादार | सानवी बिरादार | समिक्षा सतनुरे | राणी भालेराव | पवन पिलापट्टे | सायमा मुंजेवार | ओंकार मेडके | वेदांती पांडे |
| ९७.२० % | ९७.०० % | ९६.८० % | ९६.६० % | ९६.४० % | ९६.४० % | ९६.४० % | ९६.२० % | ९६.२० % | ९६.२० % | ९५.८० % | ९५.८० % |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऋषिकेश पाटील | ओमप्रकाश येलमटे | फहाद मोमीन | यशराज माने | कल्याणी सुरवसे | सलोनी देवशेट्टै | गायत्री पाटील | साक्षी मुंडे | कृष्णा शिंदे | राधा याचावाड | श्रेयश पांडे | प्राजक्ता जाधव |
| ९५.६० % | ९५.६० % | ९५.४० % | ९५.४० % | ९५.४० % | ९५.२० % | ९५.२० % | ९४.८० % | ९४.८० % | ९४.६० % | ९४.४० % | ९४.२० % |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अवनी अंबेराव | श्रेयश आचार्य | जान्हवी पेद्दावाड | प्रांजली पाटील | स्वानंदी भिंगोले | सुप्रिया गादगे | रूद्र हेरकर | भुमी सुडे | सानिका जाधव | वैभव मद्रे | तनुजा स्वामी | महालिंग व्दासे |
| ९४.०० % | ९४.०० % | ९३.८० % | ९३.८० % | ९३.४० % | ९३.२० % | ९३.०० % | ९३.०० % | ९२.८० % | ९२.८० % | ९२.८० % | ९२.६० % |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| केदार गिरी | सोहम होनमोडे | सिध्दात्री लासुने | रोहिणी तोलसडवार | उत्कर्ष बिरादार | सिंधु देवकत्ते | श्रावणी गुरमे | मगदुम शेख | चैतन्य निडबने | विवेक बिरादार | सुजल उगीले | मनिष थोटे |
| ९२.६० % | ९२.६० % | ९२.६० % | ९२.६० % | ९२.४० % | ९२.४० % | ९२.४० % | ९२.२० % | ९२.०० % | ९१.८० % | ९१.८० % | ९१.८० % |

## दहावी बोर्ड परीक्षेत १०० पैकी १०० टक्के घेतलेल्या पल्लवी कपाळेचा व पालकांचा सत्कार

उदगीर /प्रतिनिधी

येथील किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित विद्यावर्धिनी हायस्कूल उदगीर या शाळेतील विद्यार्थिनी कु. पल्लवी बालाजी कपाळे हिने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी बोर्ड परीक्षेत १०० पैकी १००% गुण घेऊन शाळेचे आई-वडिलांचे नावलौकिक केल्याबद्दल पल्लवी सह तिचे आई आशाराणी कपाळे, वडील अडवोकेट बालाजी कपाळे, आजोबा डॉ. गुरुनाथ कपाळे यांचा भव्यदिव्य असा सत्कार विद्यालयाच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी जाऊन करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे विद्यार्थी प्रिय मुख्याध्यापक व्ही. एम बांगे, परीक्षा



विभाग प्रमुख बाबासाहेब पाटील, बंडू पाटील लोणीकर, प्रयोगशाळा सहाय्यक विपुल बोरोळे, कलाशिक्षक एन. आर जवळे, प्रेरणा कपाळे, आदित्य कपाळे यांची यावेळी उपस्थिती होती. सत्कारला उत्तर देताना पल्लवी म्हणाली की ,या यशामागे शाळेतील शिक्षक, माझे आई-वडील यांचा मोठा सिंहाचा वाटा आहे. मला भविष्यात माझ्या शाळेचे आई-वडिलांचे उदगीर शहराचे नावलौकिक करायचे असून माझे स्वप्न आहे आयपीएस अधिकारी बनण्याचे आहे. असे ती सत्काराला उत्तर देताना बोलू लागली. याप्रसंगी त्यांच्या आजूबाजू च्या परिसरातील मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## जमहूर माध्यमिक विद्यालय S.S.C बोर्ड परीक्षा २०२४ च्या निकालात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी घवघवीत यशाची परंपरा कायम

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे मार्फत आयोजित एस. एस.सी. बोर्ड परीक्षेचा निकाल आज घोषित करण्यात आला. जमहूर उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बोर्ड परीक्षेच्या निकालात घवघवीत असे यश संपादित केले आहे.

विद्यालयाचा निकाल १००% टक्के लागलेला आहे. २३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश मिळवले आहे. प्रथम श्रेणीत ३७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.परीक्षेत प्रविष्ट सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.एकंदरीत विद्यालयाचा निकाल १००% लागला आहे.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थी

१. शेख उजमा समद ९२.२० % गुण

२. शेख खंसा जकी ९१.२० %

३. सिद्दिकी जोया इकबालोद्दीन ९०.४० %

४. शेख सुमया फक्रीर अहमद ८९.८०%

घेऊन यश संपादित केले.

यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांच आज शाळेत संस्थेच्या सचिव डॉक्टर अंजुम कादरी मॅडम सहसचिव शेख इब्राहिमसाब सत्तार तसेच विद्यालयाचे प्राचार्य राजा पटेल अब्दुल बाकी यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव व अभिनंदन केला. याप्रसंगी संस्था सचिवांनी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करावी. उच्चशिक्षण घेऊन राष्ट्र व समाजाची सेवा करावी व आपल्या मातापित्यांचे नाव उज्जवल करावे. जमहुर विद्यालय हे शहरातील उर्दू माध्यमातील सर्वप्रथम असे विद्यालय आहे. मागच्या ५० वर्षापेक्षा अधिक काळापासून या शाळेत विद्यार्थी उच्च गुणवत्तेने शिक्षण घेत वेगवेगळ्या क्षेत्रात आपले नाव कमवत आहेत. त्या यशाची परंपरा विद्यालयाने आजही कायम राखली याबद्दल सर्व विद्यार्थी शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य राजापटेल बाकी सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी व तसेच शिक्षक वृंद यांना हार्दिक शुभेच्छा देत अभिनंदन केले.*या प्रसंगी कार्यक्रमात पर्यवेक्षक गोलंदाज वाजिद, शेख आय. जी. हाश्मी हारीस,जम्मू एजाज,शेख मुजाहेद,अमान दायमी, शेख अयाज जगिरदार नोमान,शेख मुशीर,महिला शिक्षिका आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कर्मचारी उपस्थित होते.

००००



Shaikh Uzma Samad
92.20%



Shaikh khansa zaki
91.20%



Siddiqui Zoya Iqbaloddin
90.40%



SHaikh sumayya fakir Ahamad
89.80%


Caring Since 1980

कै. यशवंतराव बहुउद्देशिय मेडिकल रिसर्च सेंटर द्वारा संचलित

४१ वा वर्धापन

यशवंत नेत्र रुग्णालय व फॅको सेंटर

(दृष्टी-एकमेव ध्येय)

डॉ. विश्वास य. सताळकर नेत्ररोग तज्ञ | डॉ. यशोधन वि. सताळकर बाल नेत्ररोग तज्ञ | डॉ. अनुजा य. सताळकर नेत्ररोग तज्ञ

यशवंत नेत्र रूग्णालय व फॅको सेंटर

नंदादीप, नगर परिषदेच्या मागील बाजूस, नई अबादी, उदगीर फोन : 02385-256215



उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो






उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशोर (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



DEEPJYOTI EYE HOSPITAL UDGIR

दिपज्योती डोळयांचा दवाखाना

डॉ. ज्योती सोमवंशी

30 वर्षाचा अनुभव

डोळयांचे 60 हजार यशस्वी ऑपरेशन

M.B.B.S., M.S. Ophthalm
Consultant in Catract, Glaucoma,
& Pediatric Ophthalmologist

उपलब्ध सुविधा

उदगीर शहरात प्रथमच आत्याधूनीक मशिन (Infinity) व्दारे शस्त्रक्रिया.भुल न देता डोळ्या वरील मोतीबींदूचे शस्त्रक्रिया. मल्टीफोकल लेन्स यामुळे दुर आणी जवळचे चष्मा न घालता दिसण्याची सोय (Spectacle Free).बीनाटाक्याची मोतीबींदूवर शस्त्रक्रिया.लहान मुलामध्ये मोतीबींदू वर उपचाराची सोय.काच बिंदूचे निदान, उपचार,शस्त्रक्रियाची सोय. डोळयावरील पडदा, नासूर उपचाराची सोय.कॉम्प्युटर व्दारे नेत्र तपासणी.

नाईक चौक,निडेबन रोड, उदगीर जि.लातूर

"WE CARE FOR YOUR EYES"




# यशवंत विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न




अहमदपूर दि.२८ (कारामुंगीकर) शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यशवंत विद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळालेले असून ९०% पेक्षा जास्त घेणारी १३६ मुलं आहेत.

त्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार टागोर शिक्षण समितीचे सचिव शिक्षण महर्षी, दलित मित्र डी. बी. लोहारे गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव डॉ. सुनिता चवळे, मुख्याध्यापक गजानन शिंदे, उप मुख्याध्यापक राजकुमार घोटे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. अशोक सांगवीकर, डॉ. भालचंद्र पैके, डॉ. सुनिता चवळे यांचे मार्गदर्शनपर भाषणे झाली .अध्यक्षीय समारोप शिक्षण महर्षी, दलित मित्र डी. बी. लोहारे गुरुजी यांच्या भाषणाने झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक राम तत्तापुरे यांनी सूत्रसंचालन राजकुमार पाटील यांनी तर आभार राजकुमार घोटे यांनी मांनले. या सोहळ्याला गुणवंत विद्यार्थी त्यांचे पालक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नागरिकांनी पाण्याचा अपव्यय न करण्याचे आवाहन

लातूर/ प्रतिनिधी: शहरातील गुळ मार्केट चौकात नादुरुस्त नळ जोडणीमुळे पाण्याची गळती होत असल्याचे लक्षात आल्यानंतर मनपाकडून तातडीने कार्यवाही करत ती जोडणी तोडण्यात आली. संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करण्याचे आवाहनही मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील गुळ मार्केट चौकात एका नळ धारकाची जोडणी नादुरुस्त होती.सोमवारी त्यातून पाण्याची गळती होत असल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात घेता मनपाने मंगळवारी (दि.२८)तातडीने कार्यवाही करत पाण्याची गळती नेमकी कोठून होत आहे याचा शोध घेतला. मनपाच्या मुख्य वाहिनीला गळती नसल्याचे यातून स्पष्ट झाले परंतु एका नळ जोडूनीतून ही पाणी गळती होत होती.पालिकेने तातडीने ती नळ जोडणी बंद केली.यामुळे पाण्याची होणारी गळती थांबली आहे. सध्या लातूरकरांना मांजरा प्रकल्पातील मृत साठ्यातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी मनपा काळजी घेत आहे.या बाबीची दखल घेत शहरातील नागरिकांनीही पाणी जपून वापरावे.ज्या नळ धारकांच्या जोडण्या नादुरुस्त आहेत त्यांनी त्या तातडीने दुरुस्त करून पाण्याची नासाडी थांबवावी.पाण्याचा अपव्यय करू नये.उपलब्ध पाणी जपून वापरावे.

नळाला तोट्या बसवाव्या. अद्याप पावसाळा सुरू झालेला नसल्याने प्रकल्पात पाणीसाठा लवकर होणार नाही. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी. जे नागरिक नादुरुस्त नळ जोडणीमुळे पाण्याचा अपव्य करतील त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केली जाईल,असा इशाराही मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.




## विमलाबाई देशमुख कन्या शाळेचे एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

अहमदपूर दि. २७ (कारामुंगीकर) : येथील विमलाबाई देशमुख कन्या शाळेने एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, माहे मार्च २०२४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेमध्ये या एकूण ८६ विद्यार्थीनी बसले असून ८३ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाले. शाळेचा निकाल ९६.५१% एवढा लागला असून कु. कदम संस्कृती ही विद्यार्थिनी १००% आणि रानभरे दर्शना ही विद्यार्थिनी १००% गुण घेऊन विद्यालयात प्रथम आले आहेत. सुरनर ज्ञानेश्र्वरी ९९% द्वितीय, कोलवाड नम्रता ९८.६०% तर ९०% च्या वरील ११ ,तसेच ८५% च्या वरील ०९ विद्यार्थी आहेत. विशेष प्राविण्यामध्ये ४२ विद्यार्थिनी, प्रथम श्रेणीत ३० विद्यार्थीनी, द्वितीय श्रेणीत ०९ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे लोकायत शिक्षण संस्थेचे अध्यक्षा श्रीमती सीमाताई देशमुख, उपाध्यक्ष आबासाहेब देशमुख, सचिव ड. पी.डी. कदम, सहसचिव बाबासाहेब देशमुख, मुख्याध्यापिका श्रीमती कोयले एस.ए.(पाटील), पर्यवेक्षिका शेंडगे मॅडम, राऊत मॅडम, देशमुख सर, पेड सर, जाधव सर , जाधव मॅडम , सोनवळे सर, रेड्डी मॅडम ,गोकुळे सर, बत्तुलवार सर विद्यालयातील अध्यापक / अध्यापिका यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले.

## जि.प.प्रशाला हडोळतीच्या विद्यार्थ्यांचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

हडोळती दिनांक २८(नागसेन गायकवाड): अहमदपूर तालुक्यातील हडोळती येथील जि.प. प्रशालेचा दहावीचा निकाल ९३.४४% लागला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, हडोळती येथील जि.प. शाळेचे १४ विद्यार्थी विशेष प्राविण्यामध्ये पास झाले आहेत. २७ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये, द्वितीय श्रेणीमध्ये १४ विद्यार्थी तर तृतीय श्रेणीमध्ये ०२ विद्यार्थी पास झाले आहेत. त्यात मिरजगावे सुदर्शन लिंगुअप्पा हिने ९६.२०% गुण घेऊन प्रथम, भोगे रोहिणी दत्तात्रय ८९.००% द्वितीय तर बोडके साहस सिद्धार्थ ८८.४०% सर्व तृतीय आला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे प्रशालेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सचिव व सर्व सदस्य तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक एम.डी. मोरे , एन.टी.मोरे, महालिंगे,गायकवाड सर व शाळेचे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी गावातील पालक व हडोळती परिसरातील सर्व पालकांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

****

## जिल्ह्यात तीन शासकीय निवासी शाळेतील इयत्ता दहावीचा १०० टक्के निकाल

जालना-सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत जालना जिल्ह्यात जालना, बदनापूर व भोकरदन येथे अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळा सुरु आहेत. या निवासी शाळेत प्रत्येकी २०० मुले-मुली शिक्षण घेत आहेत. सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात या तिन्ही शाळेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. अशी माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त प्रदीप भोगले यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.जालना येथील अनुसूचित जाती व नवबौध्द मुलींच्या शासकीय निवासी शाळेतील प्रज्ञा सोनकांबळे ८५.६० टक्के, मिरा बोर्डे ८१.२० टक्के, अरुणा खरात ७८.६० टक्के, बदनापूर येथील अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांच्या शासकीय निवासी शाळेतील आर्यन गायकवाड ८८.८० टक्के, आदित्य कांबळे ८७.८० टक्के, यशराज शिंदे ८४ टक्के, भोकरदन येथील अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळेतील जीवन सुरडकर ९३.२० टक्के, धम्मपाल सुरडकर ९१.४० टक्के, पवन मोरे ८९.४० टक्के या अनुक्रमे प्रथम , द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे. मागील तीन वर्षापासून या तिन्ही शाळांनी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. या शाळेतील यशस्वी निकालाबद्दल प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवडे, सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांच्यासह मुख्याध्यापक श्रीमती सुर्यकला गोसावी, डॉ. दिलीप गिरी व रघुनाथ खेडेकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक करत अभिनंदन केले. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

***

## अग्रवाल पिता-पुत्राला चार दिवसांची पोलीस कोठडी!

पुणे,२८ मे (पीएसआय)-पुणे अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपी मुलाचे वडील आणि पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल याला २४ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. मुलगा अल्पवयीन असूनही त्याच्या हातात कार दिल्यामुळे ही अटक करण्यात आली होती. तर मुलाचे आजोबा सुरेंद्र कुमार अग्रवाल यांना देखील २८ मे पर्यंत तुरुंगात ठेवण्यात आलं. मुलाचा आरोप ड्रायव्हरने स्वत:च्या अंगावर घ्यावा, यासाठी ड्रायव्हरवर दबाव टाकल्याप्रकरणी व त्याला डांबून ठेवल्याप्रकरणी सुरेंद्र कुमारवर ही कारवाई करण्यात आली होती. यानंतर आज झालेल्या सुनावणीत अग्रवाल पिता-पुत्राला आणखी चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## महात्मा फुले महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती साजरी

अहमदपूर दि. २८ (कारामुंगीकर) - येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बी.के. मोरे हे होते तर पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय राणीसावरगाव येथील भूगोल विभागाचे प्रा. डी. आय. पाठण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग चिलगर यांनी केले तर आभार व मारोती कसाब यांनी मानले. यावेळी प्रो. डॉ. अभिजीत मोरे, डॉ. सतीश ससाणे, डॉ.डी. एन. माने, डॉ. संतोष पाटील, डॉ. दत्ता कांबळे, प्रशांत डोंगळीकर, अजय मुरमुरे, चंद्रकांत धुमाळे, चंद्रकांत शिंपी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दयानंद विज्ञानमध्ये स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२८ मे २०२४ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी स्वांतत्र्यसैनिक,समाजसेवक,लेखक व कवी,भाषाशुद्धी व लिपिशुद्धी चळवळीचे प्रणेते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि जयंतीच्या सर्वांना शुभेच्छाही दिल्या.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील व डॉ.संध्या कोल्हे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,बन्सी कांबळे, डॉ.प्रमोद माने,सुदाम सातपुते,विनोद घार,किशोर जाधव,सतीश तांदळे, रजनीकांत मदने,सुदर्शन काळे,शंकर सूर्यवंशी,अमोल क्षिरसागर, ज्ञानेश्र्वर राऊत,बाबासाहेब बचाटे, तेजस काळे यांच्यासह प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## नळधारकाची नादुरुस्त जोडणी केली बंद मनपाची कार्यवाही

नागरिकांनी पाण्याचा अपव्यय न करण्याचे आवाहन

लातूर/ प्रतिनिधी: शहरातील गुळ मार्केट चौकात नादुरुस्त नळ जोडणीमुळे पाण्याची गळती होत असल्याचे लक्षात आल्यानंतर मनपाकडून तातडीने कार्यवाही करत ती जोडणी तोडण्यात आली. संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करण्याचे आवाहनही मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील गुळ मार्केट चौकात एका नळ धारकाची जोडणी नादुरुस्त होती.सोमवारी त्यातून पाण्याची गळती होत असल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात घेता मनपाने मंगळवारी (दि.२८)तातडीने कार्यवाही करत पाण्याची गळती नेमकी कोठून होत आहे याचा शोध घेतला. मनपाच्या मुख्य वाहिनीला गळती नसल्याचे यातून स्पष्ट झाले परंतु एका नळ जोडूनीतून ही पाणी गळती होत होती.पालिकेने तातडीने ती नळ जोडणी बंद केली.यामुळे पाण्याची होणारी गळती थांबली आहे.

सध्या लातूरकरांना मांजरा प्रकल्पातील मृत साठ्यातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी मनपा काळजी घेत आहे.या बाबीची दखल घेत शहरातील नागरिकांनीही पाणी जपून वापरावे.ज्या नळ धारकांच्या जोडण्या नादुरुस्त आहेत त्यांनी त्या तातडीने दुरुस्त करून पाण्याची नासाडी थांबवावी.पाण्याचा अपव्यय करू नये.उपलब्ध पाणी जपून वापरावे. नळाला तोट्या बसवाव्या. अद्याप पावसाळा सुरू झालेला नसल्याने प्रकल्पात पाणीसाठा लवकर होणार नाही. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी.जे नागरिक नादुरुस्त नळ जोडणीमुळे पाण्याचा अपव्य करतील त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केली जाईल,असा इशाराही मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.

# डॉ. तावरेंना अधिक्षकपदासाठी शिफारस करणारा मंत्री व आमदार कोण?

मुंबई,-राज्यात सध्या दुष्काळाचा प्रश्न गंभीर आहे तर दुसरीकडे दारू आणि ड्रग्जचे सेवन करुन सर्वसामान्य लोकांना गाडीखाली चिरडण्याचे प्रकार वाढत आहेत. नागपूर, जळगाव व पुण्यात अशा घटना घडल्या पण अत्यंत संताप आणण्याचा प्रकार म्हणजे यातील गर्भश्रीमंत आरोपींना तातडीने जामीन कसा मिळेल यासाठी सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून प्रयत्न झाले. पुण्याच्या प्रकरणात गर्भश्रीमंत व्यक्तींना वाचवण्यासाठी राजकीय हस्तक्षेप झाल्याचे दिसत असल्याने राज्याच्या यंत्रणेवर विश्वास नाही, पुण्याच्या अपघात प्रकरणाची चौकशी सीबीआयमार्फतच झाली पाहिजे, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपा सरकारचा समाचार घेतला. ते पुढे म्हणाले की, पुण्यात गर्भश्रीमंत व्यक्तीच्या अल्पवयीन मुलाने कारखाली दोघांना चिरडले, त्याआधी त्याने मद्यपान केले होते, यावेळी त्याच्यासोबत एका आमदाराचा मुलगाही होता, तो कोण हे समजले पाहिजे. पुण्यातील घटनेत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:च्या वकीलीचा वापर आरोपींना वाचवण्यासाठी केला. पुण्यात ड्रग्जचा अवैध धंदा जोरात सुरु आहे. पुणे व नागपूर शहरातही अवैध पबने थैमान घातले आहे. कार अपघात प्रकरणानंतर पुण्यातील ३६ अवैध पब पाडावे लागले. गुजरातमधून मोठ्या प्रमाणात ड्रग्ज महाराष्ट्रात आणून तरूण पिढीला बरबाद करण्याचे पाप भाजपाने केले आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी खुलासा करावा व या प्रकरणी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका संशयास्पद वाटते, त्यांचा राजीनामा घ्यावा. नागपूर या गृहमंत्र्यांच्या शहरातही दोन मुलींनी दोन युवकांना गाडीखाली चिरडून मारले तरीही त्यांना १० तासात जामीन मिळाला. जळगावातही गाडीखाली चिरडण्यात आले व त्यातही आरोपीला वाचवण्याचे प्रयत्न झाला. पुण्याच्या ससून हॉस्पिटमधील डॉ. तावरेंनी आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलले. ससूनमध्ये ड्रग माफिया ललित पाटीलला सर्व सोयी सुविधा पुरवण्यात आल्या होत्या, येथून ललित पाटील पळूनही गेला होता. ससूनचे डॉक्टर तावरे यांना अधिक्षक पदासाठी नियुक्त करावे यासाठी एक मंत्री व आमदार यांनी शिफारस केली होती. तो मंत्री व आमदार कोण हे जनतेला समजले पाहिजे. सत्ताधारी पक्षाचा हस्तक्षेप सर्व क्षेत्रात वाढला असून गुन्हेगार मोकाट सुटले आहेत. इंदापूरमध्ये तहसीलदारांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला. गुन्हेगारांची अशी हिम्मत होतेच कशी, राजकीय आशिर्वाद असल्याशिवाय असे होऊ शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले आंबेडकर यांच्या राज्याला बदनाम करण्याचे पाप भाजपाने केले आहे असेही नाना पटोले म्हणाले.अभ्यासक्रमात मनुस्मृती आणण्यास काँग्रेसचा विरोध..शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती आणण्याचा डाव भाजपाने रचला असून कोणत्याही परिस्थितीत काँग्रेस हे होऊ देणार नाही.

मनुस्मृतीत महिलांना काहीच स्थान नाही. संविधान हटवून त्या जागी मनुस्मृती आणण्याचा प्रयत्न आहे तो कदापी यशस्वी होणार नाही.

मनुस्मृतीचा अभ्यासक्रमात समावेश खपवून घेणार नाही, असा इशाराही नाना पटोले यांनी दिला आहे.या पत्रकार परिषदेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आमदार वजाहत मिर्झा, माजी खासदार हुसेन दलवाई, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे उपस्थित होते.

### हरवले आहे

नम्रता विजयकुमार नंदवे या नावाची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामवाडी ख तालुका रेनापुर जिल्हा लातूर या शाळेची इयत्ता२ पासची टीसी लातूर ते पुणे प्रवास दरम्यान हरवली आहे कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा

**मो नं ९३७३६८१८१७**

### हरवले आहे

श्री सुळ संभाजी गोविंदराव या नावाचे,महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळ सुळ गल्ली, लातूर संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र दि १५.०५.२०२४, बुधवार रोजी ऑडीट कामासाठी जात असताना सुळ गल्ली ते हनुमान चौक हरवले आहे. कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

पत्ता- श्री सुळ संभाजी गोविंदराव

(सचिव- म. गांधी शिक्षण प्रसारक मंडळ लातूर)

**मोबा-९९२३१५०५५५**

### CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM SARSWATI DEVIDASRAO ACHOLE TO SARASWATI DEVIDASRAO ACHOLE HENCE FROTH THIS DECLERETION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE SARASWATI DEVIDASRAO ACHOLE IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY

**OLD NAME :-** SARSWATI DEVIDASRAO ACHOLE

**NEW NAME :-** SARASWATI DEVIDASRAO ACHOLE

1, SHINDE LAXMIBAI KESHAV is legally mother of No. 17026994H Rank- HMT Name Shinde Govind Keshav, of Unit- 402 SATA Regt Wksp C/o 99 APO Pin- 906402 R/O Vill- Khanapur, Post- Kingaon, Teh- Ahemadpur, Distt- Latur, State- Maharashtra, Pin- 413523. I have changed my name from Laxmi to Shinde Laxmibai Keshav due to wrongly mentioned in my son's service record vide affidavit No__________dt / 2024 before Parli Vaijanath.

### CHANGE IN NAME

I have change my name from VIKAS VASANTRAO SURYWANSHI To VIKAS VASANTRAO SURYAWANSHI Hence for this declaration in future.

OLD NAME: VIKAS VASANTRAO SURYWANSHI

NEW NAME: VIKAS VASANTRAO SURYAWANSHI

In future the same name will be used by my spouse and children

**ADDRESS**

RAJ YOG , NEAR CHAME WELL , SAMBHAJI NAGAR , LATUR , 413512 , MAHARASHTRA .

Mobile No: 9145555669


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार

स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

### लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत उदगीर

बुधवार दि. २९ मे २०२४

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



### बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# केलेले कर्म ईश्वराला अर्पण करा -प.पु.स्वामी प्रत्ययानंद सरस्वती

## गहिणीनिथ महाराज औसेकर यांची ग्रंथतुला






उदगीर (प्रतिनिधी) संसाराची संकल्पना मनात न ठेवता भगवंताच स्मरण करा माझे माझे म्हणू नका सर्व ईश्र्वराचे आहे जीवनात जेकर्म करतो ते ईश्वराला अर्पण करा असे विचार प.पपू.स्वामी प्रत्यानंद सरस्वती यांनी व्यक्त केले.

येथील प्रसिध्द उद्योजक प्रदिप बेद्रे यांच्यावतीने रघूकुल मंगल कार्यालयात प.पपू.स्वामी प्रत्यानंद सरस्वती यांची १०१ वा भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा २६ मे पासुनासुरु आहे .भागवत कथेच्या तिसर्या दिवशी कपील गीताा,दक्ष कथा ,ध्रुव कथा,पथू चरित्र यावर प.पपू.स्वामी प्रत्यानंद सरस्वती यांनी विवेचन केले.

प्रत्येकांनी आपल्यााईंद्रियिवर नियंत्रणाठेवले पाहिजे सदगुरुच्या ज्ञानाशिवाय मुक्ती नाही भगवंत हेच सर्वांचा आधार आहे.जे लोक देवासाठी कार्य करतात ते कधीच दुःखी होत नाहीत असे विचार व्यक्त केले.

याप्रसंगी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे अध्यक्ष सदगुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे बेद्रे परिवाराच्यावतीने प्रदिप बेद्रे यांनी पाद्यपुजन करुन स्वागत केले व आशिर्वाद घेतला. या वेळी सदगुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांची ग्रंथतुला करण्यात आली तर प्रदिप बेद्रे यांच्या विवाहाच्या ४२ व्या वाढदिवसानिमित्य धान्यतुला करण्यात आली.यावेळी मा.पी. डी.सुभेदार यांनी सपत्निक सदगुरु गहिनिनाथ महाराज औसेकर व प.पपू.स्वामी प्रत्यानंद सरस्वती दर्शन घेतले.या प्रसंगी अशोक बेद्रे,दिलिप बेद्रे, प्रदिप बेद्रे,मंदाकिणी प्रदिप बेद्रे, सतिष बेद्रे, प्रविण बेद्रे,मनोज बेद्रे,अषिश बेद्रे,योगेश बेंद्रे,प्रज्ञा परीमल बेद्रे,रितेश बेद्रे,राजेश बेद्रे,समर्थ बेद्रे,अनंत बेद्रे,ओजश्र्वी बेद्रे,अनिलकुमार व्यंकोबाजी डोईजोडे,ज्योती अनिल डोईजोडे.आदी उपस्थित होते भागवत कथेस उदगीर शहरातील महिला पुरुष भक्त मोठ्या संखेने उपस्थित होते.


# श्री पांडुरंग विद्यालयाचे शालांत प्रमाणपत्र परीक्षेत घवघवीत यश



बेंबडे किरण तुकाराम (473 गुण) 94.60% प्रथम

देवकत्ते मयुरी राम (456 गुण) 91.20%

कांबळे माधुरी सिध्देश्वर (455 गुण) 91.00%



मोरे साक्षी परमेश्वर (453 गुण) 90.60%

गुरमे विजयराज मनोहर (451 गुण) 90.20%

उदगीर/ प्रतिनिधी- शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ मध्ये श्री पांडुरंग विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखत याही वर्षी घवघवीत यश संपादन केले आहे.

विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.५२ % इतका लागला आहे.

विद्यालयातून प्रथम - कु. बेंबडे किरण तुकाराम ५०० पैकी ४७३ गुण ९४.६० % द्वितीय - कु. देवकते मयुरी राम ४५६ गुण ९१.२० % तृतीय - कु. कांबळे माधुरी सिद्धेश्र्वर ४५५ गुण ९१.०० कु. मोरे साक्षी परमेश्र्वर ४५३ गुण ९०.६० % गुरमे विजयराज मनोहर ४५१ गुण ९०.२० % विशेष प्राविण्यसह ४७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री गोविंदरावजी केंद्रे साहेब, संस्थेचे सचिव श्री विनायकरावजी बेंबडे साहेब, शाळेचे मुख्याध्यापक श्री नादरगे एस. व्ही. सर, शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# भाऊसाहेब सहकारी बँकेचे चेअरमन तळेगावकर व मुख्यकार्यकारी अधिकारी कुलकर्णी भारतरत्न सहकारिता पुरस्काराने सन्मानित

उदगीर (ता.प्र.) येथील भाऊसाहेब सहकारी बँकेचे चेअरमन भगवानराव पाटील तळेगावकर व मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. एल. एम. कुलकर्णी यांना मुंबई येथे सहकार क्षेत्रातील प्रतिष्ठित भारतरत्न सहकारिता सन्मान-२०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बँकींग क्षेत्रात उत्तम प्रकारे काम करणारी व दर्जेदार सेवा देणारी अग्रगण्य बँक म्हणून भाऊसाहेब सहकारी बँकेची ओळख आहे. बँकेने आजपर्यंत यशस्वी वाटचाल केली असून २०२३-२४ मध्ये विशेष प्रगती केली आहे. बँकेस मार्च २०२४ अखेर १ कोटी १५ लक्ष रुपयांचा निव्वळ नफा व ०.४६ टक्के नेट एनपीए झाला असून रिझर्व्ह बँकेचे आणि सहकार कायद्याचे जाण ठेऊन बँकेने उत्तम व्यवस्थापन केले आहे. या कामी बँकेचे चेअरमन भगवानराव पाटील तळेगावकर यांना अर्बन बँक सर्वोत्कृष्ट चेअरमन या श्रेणीतील प्रतिष्ठित भारतरत्न सहकारिता सन्मान हा संपूर्ण देशातील बँकेतून जाहीर झाला. हा पुरस्कार बँकेचे उत्कृष्ट व्यवस्थापन व उत्तम कामगिरी साठी दिला जातो. बँकेचे चेअरमन यांना डिजीटल बँकिंगची आवड आहे, त्यामुळे त्यांनी बँकेत अनेक प्रकारे आधुनिकता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

तसेच बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी यांना सुद्धा बँकेच्या यशस्वी वाटचालीत मोलाचे कार्य व उत्कृष्ठ संचालन केल्याने सर्वोत्कृष्ट मुख्यकार्यकारी अधिकारी या श्रेणीतील प्रतिष्ठित भारतरत्न सहकारिता सन्मान जाहीर झाला. कुलकर्णी यांना बँकिंग क्षेत्रातील प्रचंड अनुभव व त्यांनी अनेक पदव्या संपादन केल्यामुळे याचा बँकेस विषेश सहकार्य लाभले. बीटूबी इन्फोमेडिया व अँक्नोलेज पार्टनर नॅफकब नवीदिल्ली यांनी मुंबईतील हॉटेल ललित येथे पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी भारत सरकारचे आयटी आणि कम्युनिकेशन मंत्रालयाचे संयुक्त सचिव सुमनेश जोशी यांच्या हस्ते भाऊसाहेब सहकारी बँकेचे चेअरमन श्री तळेगावकर व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कुलकर्णी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्कार स्विकारतेवेळी बँकेचे संचालक ईश्र्वर खटके व दिनेश पाटील उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल बँकेचे चेअरमन भगवानराव पाटील व मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी यांचे बँकेचे सर्व संचालक, कर्मचारी, ग्राहक, सभासद व हितचिंतक यांनी अभिनंदन केले.

# उदयगिरी अकॅडमीची एसएससी बोर्ड परीक्षेत उत्तुंग भरारी

उदगीर: उदगीर शहरातील अग्रगण्य शैक्षणिक चळवळ उदयगिरी अकॅडमीतील संकेत कमलापुरे या विद्यार्थ्याने १००% गुण मिळवून लाल बहादूर शास्त्री शाळेतून सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

तसेच माधव जाधव(९९.८०%), सायली सावळे (९९.४०%),पार्थ केंद्रे (९९.४०%), अंकिता खांडेकर (९९.२०%), प्रिया गायकवाड (९९%), गायत्री गव्हाणे (९९%), रोहन पाटील (९८.८०%), सिद्धेश्र्वर जायभाये (९८.४०%), सिद्धारामेश्र्वर वडले(९८.२०%), श्रेयस आचार्य (९८%), अथर्व धोंगडे (९८%), अमित बिरादार (९८%) अश्या एकूण ३१ विद्यार्थ्यांनी ९५% पेक्षा अधिक गुण व ४९ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा



अधिक गुण मिळविले आहेत. गणितात १०० पैकी १०० घेणारे २ विद्यार्थी तर १०० पैकी ९९ गुण घेणारे ८ विद्यार्थी , डलळशपलश मधे १०० पैकी १०० घेणारा १ तर १०० पैकी ९९ गुण घेणारे ३ विद्यार्थी, इंग्रजीत १०० पैकी ९८ व ९७ घेणारे ३ तर संस्कृतमधे १०० पैकी १०० घेणारे ९ विद्यार्थी आहेत.

या सर्व गुणवंतांचा सत्कार प्रमुख पाहुणे प्रा.शिवराज अंबूलगे, प्रा. देवीदास खिंडे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकॅडमीचे संचालक प्रा. गोपाळकृष्ण घोडके, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उदयगिरी अकॅडमीचे मार्गदर्शक प्रा. संतोष पाटील, प्रा.डॉ धनंजय पाटील, प्रा. ज्योती खिंडे, प्रा.मीनाताई हुरदळे, प्रा. श्रीगण रेड्डी, प्रा.नंदिनी नीटूरे, प्रा. निवेदिता भंडारे ,प्रा.गोविंद केंद्रे आदींनी परिश्रम घेतले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा फेटे बांधुन सत्कार करण्यात आला व त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# माती परीक्षणावर आधारित रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा

धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) - उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथे तालुका कृषी अधिकारी डी.बी. रितापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली गाव स्तरीय खरीप हंगाम बैठक घेण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांनी माती परीक्षणावर आधारित रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा असा महत्त्वपूर्ण सल्ला कृषी तज्ञांनी दि.२८ मे रोजी बैठकीत दिला.



सुपतगाव येथे कृषी विभागाच्या अंतर्गत माती परीक्षण व त्याचे महत्व, सोयाबीन बियाणे उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक, जमीन आरोग्य पत्रिकेच्या आधारे रासायनिक खताचा संतुलित वापर करणे, रुंद सरी वरंबा पद्धतीने सोयाबीन, तूर पिकाची लागवड करणे, सोयाबीन पिकाची गादीवाफा टोकन पद्धतीने पेरणी करणे, शंखी गोगलगाय नियंत्रण व उपाय योजना, रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, खरिप हंगामातील पीक प्रात्यक्षिकासाठी ऑनलाईन अर्ज करणे, अनुदानावर प्रमाणित बियाणे (परमिट बियाणे) साठी ऑनलाईन अर्ज करणे, महाडीबीटीवरील कृषी विभागाच्या सर्व योजना या विषयावर मंडळ कृषी अधिकारी ए.बी. पटवारी, कृषी पर्यवेक्षक एल.व्ही. फडणीस यांनी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी अतुल गायकवाड, कृषी सहाय्यक ए.एच. भालेराव, गावातील सरपंच व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जळकोट तालुक्याचा १० वी बोर्डाचा निकाल ९७ टक्के

**माधव होनराव**

जळकोट : / प्रतिनिधी- मार्च २०२४ मध्ये दहावी बोर्डात जळकोट तालुक्याचा ९७.६९ टक्के निकाल लागला आहे.

तालुक्यातून १३६७ विद्यार्थ्यी होते. त्यातील १३०३ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. १२६९ विद्यार्थी उर्तिण झाले आहेत. तालुक्यातील ३५ शाळांपैकी १६ शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

जळकोट शहरातील जिल्हा परिषद शाळा- ९८.८७ टक्के , श्री गुरुदत्त विद्यालय- ९८.२७, शकुंतला माता विद्यालय- ९२.३०, श्री संत गोविंद स्मारक विद्यालय वांजरवाडा - ९७ .५० टक्के , विकास विद्यालय अतनुर- १०० टक्के, ज्ञान विकास विद्यालय पाटोदा बु.-९७.२२, माध्यमिक आश्रमशाळा डोंगरगाव- ९९.२२, ज्ञानवर्धनी विद्यालय मंगरुळ- ९७.२२, संत नामदेव विद्यालय धामणगाव- ९६.४२, संत तुकाराम विद्यालय जगळपुर- १०० टक्के, संभाजी विद्यालय घोणसी-१०० टक्के, धोडूतात्या विद्यालय माळहिप्परगा- १०० टक्के, श्री समर्थ धोडूतात्या विद्यालय कोळनुर -९५.४५, समर्थ धोडूतात्या विद्यालय कुणकी- १००टक्के , श्री शिवाजी विद्यालय लाळी-१०० टक्के, एम.एन पाटील माध्यमिक विद्यालय बेळसांगवी-९४.४४ टक्के, क्रांती माध्यमिक विद्यालय केकत सिंदगी- १००टक्के, माध्यमिक आश्रम शाळा शिवाजीनगर-१००टक्के, रामकृष्ण पाटील विद्यालय सोनवळा-१००टक्के, ज्ञानेश्र्वर विद्यालय गुत्ती-९५.२३ टक्के, उज्वल्ल माध्यमिक विद्यालय घोणसी-९६.६६ टक्के, क्रांती विद्यालय तिरुका-९८.१८ टक्के, संत ज्ञानेश्र्वर विद्यालय सोनवळा-१०० टक्के ,महात्मा गांधी विद्यालय रावणकोळा- १००टक्के, मराठवाडा विद्यालय चेरा-९५.७४ टक्के, माध्यमिक आश्रम शाळा चिचोली-१०० टक्के, खाजा गरीबन नवाज उर्दू शाळा जळकोट-९६.४२ टक्के, मातोश्री माध्यमिक विद्यालय कंरजी-६९.२३ टक्के,राजश्री शाहु विद्यालय जळकोट-१०० टक्के, महात्मा फुले पब्लिक स्कूल जळकोट -१०० टक्के, शंकुतला माध्यमिक आश्रमशाळा पाटोदा बु-८७.५० टक्के असा निकाल लागला आहे. तालुक्यातील एकुण निकाल ९७.३९ टक्के लागला आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्याचे तहसीलदार सुरेखा स्वामी, पोलिस निरीक्षक प्रदीप काकडे, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, गटशिक्षणाधिकारी- जयसिंह जगताप आदिनी अभिंनदन केले आहे.

# सुरक्षारक्षकाच्या मुलीचे दहावी परिक्षेत सुयश

धाराशिव दि.२८ (प्रतिनिधी) - वडील साखर कारखान्यात सुरक्षारक्षक, आई शेतमजुरीचे काम करून मुलांच्या शिक्षणासाठी करीत असलेले प्रयत्न आणि त्याची जाणीव ठेवून प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत रोशनी बालाजी धनेराव हिने १० वीच्या परिक्षेत ९१ टक्के गुण मिळवून कुटुंबाचा आणि शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. तिच्या जिद्द व चिकाटीने तिला हे सुयश मिळवून दिल्याने गुरूजनांनीही तिच्या घरी जावून तिचे कौतूक केले आहे.



लोहारा तालुक्यातील कोंडजीगड येथून समुद्राळ येथील जयस्वामी नारायण विद्यालयात शिक्षणासाठी रोशनी बालाजी धनेराव ही ये-जा करून शिक्षण घेत होती. तिच्या घरची परिस्थितीत बेताचीच आहे. वडील भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखान्यात सुरक्षारक्षक म्हणून कामाला आहेत. आई ज्योती धनेराव या शेतमजुरीचे काम करून मिळेल त्या रोजगारातून कुटुंबाची उपजीविका भागविणे आणि मुलींच्या शिक्षणात तडजोड नको म्हणून शिक्षणासाठी हवे ते प्रयत्न आई-वडिलांनी केले. या प्रयत्नांची रोशनीने जाणीव ठेवत जिद्दीने दहावीत अभ्यास केला. घरखर्च भागत नसला तरी या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हे एकमेव माध्यम आहे. हे जाणून रोशनीने मोठ्या जिद्दीने अभ्यास केला व दहावीच्या परिक्षेत ५०० पैकी ४५८ गुण मिळविले. दहावी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या धनेराव कुटुंबीयांना तिच्या महागड्या शिक्षणाची चिंता आहे. तरीही काहीतरी करू परंतू मुलीला डॉक्टर व्हायचे आहे. त्यासाठी हवे ते कष्ट करायला आपण तयार असल्याची प्रतिक्रिया रोशनीच्या आई-वडिलांनी दिली. दरम्यान रोशनीने १० वीच्या परिक्षेत सुयश मिळविल्याबद्दल तिचा मुख्याध्यापक कोकाटे, शिक्षक सहदेव कांबळे, व्ही.के. धनेराव, एस.व्ही. सुरवसे, चव्हाण व राठोड यांनी घरी जावून तिचा सत्कार केला.


**टी.सी हरवली आहे.**

माझी मनिष सुखानंद वडले या नावाची दहावीपासची मुळ टि.सी.२२ मे ०२४ रोजी बस स्टँड ते उदगीर शहर पोलिस स्टेशन दरम्यान प्रवासात हरवली आहे.

कोणास सापडल्यास खालील मो.न.वर संपर्क साधावा

मो.नं.९४२१४८६५९४